# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०३**

MAHMARI 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ४ / मार्च २००६

## संपादकीय

## गुणवत्तेचा ध्यास

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष भारताच्या भेटीला येऊन जातात त्यापाठोपाठ रशिया, ऑस्ट्रेलिया इ. देशांचे प्रमुखही भारत भेटीसाठी येतात. विविध करारांवर स्वाक्षऱ्या होतात आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रवाह वेगळ्या वाटा वळणे घेत रहातात. राष्ट्रीय राजकारणाची प्रतिबिंबे माध्यमांत सातत्याने उमटत रहातात त्यामुळे त्यांचे संदर्भ समजणे त्या मानाने सोपे असते. पण आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताकडे सगळ्यांचे लक्ष वेधले जाते तेव्हा त्याचे संदर्भ गुंतागुंतीचे असतात.

एक सामान्य मतदार, नागरिक म्हणून आपण या पार्श्वभूमीवर विचार केला तर आपल्यापुरत्या जेथे सुधारणा करणे, बदलणे अनिवार्य आहे अशा असंख्य जागा असलेल्या लक्षात येतात. माननीय राष्ट्रपतींचे भारत महासत्ता बनण्याचे स्वप्न पूर्ण व्हावयाचे असेल तर या प्रक्रियेतील सर्वात सामान्य नागरिकासमोर असणारे प्रश्नांचे हिमालय कमी व्हायला हवेत. व्यक्ती आणि संस्था जीवनात रचनात्मक कार्य करताना जीव ओतून झटणारी माणसे असतात. अशी माणसे ही उद्याची आशा असतात, परंतु त्यांचे पाय ओढण्याची अनेकांची प्रदूषित वृत्ती विकासाला, प्रगतीला खीळ घालत असते. दैनंदिन जीवनात पदोपदी असे अनुभव येऊनही मन शांत ठेवावे लागते. स्वत:तील क्षमतांचा अधिकाअधिक विकास करून देशासाठी काम करावे लागते. गुणवत्ता ही आमचे फक्त ध्येय न रहाता निदिध्यास बनावयास हवी. सुरुवात नेहमी आणि नेहमीच स्वत:पासून व्हायला हवी.

तरच इतर राष्ट्रांना जाणवायला लागलेले भारताचे महत्त्व सयुक्तिक ठरेल. आणि अर्थातच गुणवत्ता साध्य करावयाची असेल तर त्यासाठी कठोर परिश्रम हा एकच पर्याय असू शकतो ! हे सर्व उदात्त, अलंकारिक आहे असे आपल्याला वाटेलही. पण तसे ते नाही, तर प्रयत्नसाध्य आहे.' स्वातंत्र्यानंतर काहीच प्रगती झाली नाही, भ्रष्टाचार वाढला' असे केवळ जपत बसण्यापेक्षा 'सकारात्मक कृती' ही देशाची गरज आहे !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक ४ / मार्च २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक ९ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री राघवेन्द्र स्वामी महाराज जीवन व कार्य प्रकरण चौथे | शं. बा. मठ | ३ |
| २) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने | यशवंत साने | ८ |
| ३) | 'दिशा' इतिहास संशोधनाच्या | श्री. र. पुरोहित | १७ |
| ४) | ''कलानुरुप बुनियादी शिक्षण'' | अमृता कुलकर्णी | २२ |
| ५) | कृषि चिकित्सालय तथा शेतकरी प्रशिक्षण केंद्र | ईश्वर देविदास थिटे | २६ |
| ६) | मुलांनी चित्रं काढायलाच हवीत | मंजिरी दांडेकर | २८ |
| ७) | नामस्मरण | सौ. मालती देवधर | ३० |
| ८) | मेंदूविषयक संशोधन आणि शिक्षण भाग १ | सौ. विशाखा देशपांडे | ३२ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री राघवेन्द्र स्वामी महाराज जीवन व कार्य प्रकरण चौथे

*राघवेंद्र स्वामी महाराजांचा भारतीय तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञान मीमांसा व प्रसार यावरील ठसा अमिट आहे. त्यांच्या संबंधांतील वेद व संस्कृतिभ्यासक शंकरराव मठांची ही लेखमाला - संपादक*

## राघवेन्द्र स्वामींची तीर्थयात्रा

सांप्रत काळी माध्यमांमुळे परस्परांना भेटणे हे सुलभ झाले आहे. पूर्वी तसे नव्हते. आज वृत्तपत्रे रोज रकानेच्या रकाने भाषणे छापून वाटप करतात. पूर्वकाळी एकमेकांना भेटण्यासाठी लोक प्रवास करीत असत. प्रत्यक्ष व्यक्तिगत गाठभेट हेच श्रेयस्कर असे. पूर्वीच्या काळी धार्मिक प्रमुख जनतेला भेटण्यासाठी तार्थयात्रा करीत असत. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, व इतर अनेक आध्यात्मिक क्षेत्रातील मंडळी दूरवर यात्रा करीत. प्रवासातील अडीचणींना तोंड देत. अशा प्रकारे या मंडळींनी भारत भ्रमण केले आहे. काश्मीर ते कन्याकुमारी प्रवास ते करीत.

तीर्थयात्रा हा एक जन सामान्यांना भेटण्याचा भाग होता. या प्रवासातून सारा भारत एक आहे. ही अनुभूती त्यांना मिळे. प्रवास बरेच दिवसाचा पण असे. ज्योतिर्लिंगे, पवित्र नद्या, थोर आचार्य वा संतांची जन्मस्थळे अगर समाधिस्थळे इत्यादींना भेटी देत असत. या सर्व प्रकारातून भारताची अखंडताच ध्यानात येत असे. शिवाय प्रसिद्ध देवस्थाने पाहिली जात. अशीच प्रथा इतरत्रही आढळते.

## पूजापाठ नित्य चाले

विद्यार्थ्यांना पाठ देण्यात तरुण संन्यासी राघवेन्द्र स्वामी निष्णात होते. ते वैष्णव मत तसेच मध्व सिध्दान्त याचे पाठ देत. ते अद्वैती लोकांना द्वैती बनवीत. त्यांच्याशी चर्चा करुन त्याना आपले म्हणणे पटवून देऊन, त्यांच्या तर्कातील फोलपणा दाखवून ते हे कार्य करीत. बऱ्याच अद्वैती लोकांना त्यानी वादात जिंकले. आपल्या शिष्यांनी खऱ्या अर्थाने राम पूजनाने कल्याण प्राप्त करुन घ्यावे असे त्यांना वाटे. मूळ रामाची पूजा ही विशिष्ट पद्धतीने करावी, अशा प्रकारे पूजा नाही झाली तर अत्यंत गरीब, अपंग अशा मंडळीना देवाचे वैभव कसे पाहावयाला मिळेल, सर्वजण काही कुंभकोणम् या ठिकाणाच्या मठात येऊ शकणार नाहीत.

## यात्रा

राघवेन्द्र स्वामींनी यात्रा केली व तेथील स्थानांमधून जे शिकण्यासारखे होते त्याचा स्वीकार केला. याचा उपयोग ग्रंथ, भाष्य आदी लिहिण्यासाठी केला. जवळ जवळ ३८ ग्रंथ त्यांनी लिहिले. त्या पैकी २४ ग्रंथ आज उपलब्ध आहेत. हे सारे ग्रंथ उत्कृष्ट माहितीपूर्ण आहेत. श्री. राघेवन्द्र स्वामींनी निश्चितपणे यात्रा कुठून कुठे केली हे जरी सांगता येत नाही तरी उत्तर व दक्षिण भारतात त्यांनी यात्रा केली हे निर्विवाद. ते कुंभकोणम्पासून निघून रामेश्वरला गेले. त्या वाटेवरील कन्याकुमारी, भिल्लपुरी, अरुणाचल, शंखमुखी, मुदाराई येथे गेले. मदुराई येथे स्वामींच्या ग्रंथांची मिरवणूक काढण्यात आली. वृध्दाचल, श्रीरंग, नमगिरीया स्थानात बरेच अद्वैती होती. तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन करीत. भिल्लपुरी येथे स्वामींनी त्यांना वादात जिंकले. ते द्वैती झाले. त्यांनी मठाला बरीच देणगी पण दिली.

दोन प्रकांड पंडित भैरवभट व वीरभद्रभट या दोघांनी अनेकांना वादविवादात जिंकले होते. त्यामुळे त्यांना एक प्रकारचा अभिमान निर्माण झाला होता. स्वामींशी

चर्चा करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. एक मोठी विद्वत् सभा भरविली. अनेक विद्वान जमले. वातावरण एकदम प्रभावीत झाले. सर्वानाच वाटले या तरुण संन्याशाचा पराभव निश्चित होईल. चार दिवस चर्चा चालली. चवथ्या दिवशी त्या उभय पंडितानी स्वामींसमोर शरणागती पत्करली. स्वामींनी उभयताना आशीर्वाद दिला. त्यांच्या विद्वतेचा गौरव केला. त्यांना आपले शिष्य बनविले.

**कन्याकुमारीत तपश्चर्या**

दुसरी मोहीम कन्याकुमारी ते उडुपीपर्यंत होती. त्या वेळी मैसूर, हरिहर, विजापूर मालखडे व इतर बरीचशी गावे होती. जवळ जवळ एक वर्षभर स्वामी हिंडत होते. स्वामींनी कन्याकुमारीत तपश्चर्या केली. उडुपी येथे त्यांचा ठराविक कार्यक्रम असे. मध्व सरोवरात स्नान, श्री कृष्ण दर्शन, व उपदेशपर प्रवचने. अनंतेश्वर मंदिरात ही प्रवचन होत. उडुपी येथे चन्द्रिका व तन्मदीपिका या व्यासरायांच्या दोन ग्रंथावर भाष्ये लिहिली. भाष्यांची नांवे, तत्त्व प्रकाश आणि न्याय मुक्तावली अशी आहेत. व्यासरायांच्या ग्रंथावर विस्तीर्ण टीका आहे. उडुपीत भूभाग खरीदला व मठ स्थापना केली. हा मठ कुंभकोणम् मठाचा भाग आहे. तेथील आठ मठांचे मुख्य स्वामींना खूप मान देत. त्या पैकी काही स्वामींच्या प्रवचनासाठी येत. आणि ते स्वामींचे चाहते शिष्य झाले. स्वामींची पटवून देण्याची पद्धत त्यांना फार आवडे. आजही जेवणापूर्वी स्वामींना वंदन केले जाते.

पुज्याय राघवेन्द्राय सत्यधर्मरताय च ।
भजतां कल्पवृक्षाय नमंता कामधेनवे ॥

हरीहर व मैसूर इथे स्वामी नदीत स्नान करीत. हरिहरेश्वराची पूजा करीत. त्यांच्या प्रवचनाला गर्दी चांगली असावयाची. तेथून ते मालखेडला गेले. तेथे जयतीर्थ राहात होते. मध्व पीठाचे ते ज्येष्ठ स्वामी होते. त्यांना अनेक लोक मान देत. तेथून स्वामी कुंभकोणमला गेले.

तिसरा दौरा मोठा झाला. त्यामुळे तो बराच काळ चालला. हा दौरा उत्तर भारतात होता. वाराणसी, गया, प्रयाग, बदरिकाश्रम, अयोध्या, वृंदावन, परत महाराष्ट्रातील कोल्हापूर, पंढरपूर इत्यादी. बदरिकाश्रमात श्री श्रेष्ठ माधवाचार्य आणि व्यासमुनि यांनी स्वामींना आशीर्वाद दिला. पंढरपूला श्री. विठ्ठलाचे दर्शन घेतले. व त्याच्या पुढे नृत्य केले. त्या वेळचा अनुभव हा अत्यंत आल्हादकारक व अवर्णनीय असाच आहे. देवतेच्या साक्षात् दर्शनाचा अनुभव हा सर्वश्रेष्ठ असतो. हा एक अतिरोमांचकारी प्रसंग मानावा लागेल. स्वामींची आध्यात्मिक बैठक उंचावलेली होती. असेच म्हणावे लागेल.

पंढरपूरहून अडोणीला स्वामी आले. मनचली या खेड्यात आले. त्यांना तेथे भक्त प्रल्हादांचा काळ आठवला. स्वामी क्षणभर चिंतनशील झाले. काय ही या जागेची अवस्था. हे गाव उजाड झाले आहे. काटे कुटे, दगड धोंडे, विंचू सर्पांनी हे व्याप्त आहे. हे गाव तुंगभद्रेच्या तीरी आहे एवढीच एक सोय. मात्र आता हे एक जंगलच राहिले आहे. प्रल्हादाच्या वेळच्या परिस्थितीची स्वामींनी कल्पना केली. तेथून ते तिरुपतीला गेले. स्वामींचा पूर्वाश्रमीचा जन्म या देवशेच्या प्रसादामुळेच झाला होता. श्री. वेंकटेशाची पूजा केली व तेथे मठ स्थापना केली. आजतागायत मध्वमठ तेथे आहे.

लांबचा व दीर्घ प्रवास घडल्यामुळे बरेच लोक संपर्कात आले. स्वामींच्या ठिकाणाचे अलौकिकत्व अनेकांच्या ध्यानात येण्यास मदत झाली. द्वैत सिध्दांतावर स्वामींची चर्चा व भाषणे होत. बरेच लोक मध्व संप्रदायी झाले. स्वामींनी अनेकाना दर्शन देऊन पावन केले. राजे रजवाडे त्यांच्या दर्शनासाठी आणि प्रवचन ऐकण्यासाठी येत व आशीर्वाद घेऊन जात. स्वामी त्रिकालज्ञ होते. आपल्या शिष्यांना अनेक मानसिक यातनांतून मुक्त केले. त्यांच्यातील दैन्य, नैराश्य आणि दयनीयता घालविली.

## लोक कल्याण

धार्मिक नेते व संत परंपरेप्रमाणे गावोगावी हिंडून जे अभागी आहेत त्यांना दिलासा देत. रुग्णाइतांना बरे करीत. व सर्व सामान्यात विश्वास निर्माण करीत. हे त्यांचे जीवनकार्य होय. या लोक कल्याणासाठीच परमेश्वराने आपल्याला जन्माला घातले आहे. राघवेन्द्र स्वामी लोकांकडे धावून जात. सांप्रत देखील त्यांना शरण येणाऱ्यांचे ते कल्याण करीत असतात. असा अनेक भक्तांचा अनुभव आहे.

आपल्या भारत वर्षाच्या यात्रेत हजारो लोकांची दुःखे त्यांनी दूर केलेली आहेत. स्वामींच्या अनुग्रहामुळे आपला योग सुरळित चालतो अशी अनेकांची धारणा होत असे. वास्तविक चमत्कारांना स्थान नव्हते. स्वामी कोणत्याही चत्मकारात फसले नाहीत. स्वामी लोकांची दुःखे दूर करत असल्याने ते चमत्कार घडवून आणतात असे सामान्यांना वाटे. स्वामींनी निसर्ग नियम कधी मोडले नाहीत. कारण द्वैत सिध्दान्ताप्रमाणे हरी हा सर्वोत्तम आहे. लोक रोगमुक्त होत असत अथवा त्यांना समाधान लाभत असे हे स्वामींच्याद्वारे होत असले तरी श्री हरीच हे घडवून आणीत असे. स्वामी फक्त त्याच्याच प्रेरणेने दैन्य नाहीसे करण्यासाठी धावून जात. स्वामींच्या जीवनात कल्याण कारी अशा कितीतरी गोष्टी घडलेल्या आहेत. हे घडावयास हवे होते म्हणून स्वामींच्या माध्यमातून घडले इतकेच.

## कही विशेष घटना

हुबळीच्या प्रवासात यात्रेत बराच त्रास झाला. ते एका बागेच्या आश्रयाला उतरले. उन्हाळ्यातील नबाबाचे ते विश्रांतीचे स्थान होते. हे कुणालाच माहीत नव्हते. आणि त्याच दिवशी नबाबाचा मुलगा साप चावल्यामुळे मरण पावला. त्याचा मृत देह तसाच पडला होता. स्वामी शिष्यासह त्या बागेत आले. तेथे पाण्याची सुबत्ता होती व छायाही भरपूर होती. हे स्थळ पूजा करण्यास योग्य आहे असे स्वामींना वाटले. त्यांच्या पूजेमुळे नबाब व त्याची बीबी यांना गडबडीमुळे त्रास होऊ लागला. पूजेनंतर भोजनही होते. पूजेतील घंटानाद व आरत्या इत्यादी जोरात चालू झाल्या. आधीच नबाब दुःखी होते त्यातून असा तापदायक नाद! यामुळे काय चालले आहे हे पाहण्यासाठी नबाब बाहेर पडले. त्याने पाहण्यासाठी आपले अधिकारी पाठविले ते देखील तिथे रमून गेले. बराच वेळ थांबून मोठ्या कष्टाने ते तेथे आले. त्यांनी पूजा पाहिली मूळराममूर्ती व तेजस्वी स्वामी याना पाहताच त्यांना स्वतःच्या डोळ्यावर विश्वासच बसेना, तेथे आपले अधिकारी तल्लीन झालेले पाहिले. त्यांचा राग मावळला ते दुःखी झाले. नबाब व बीबी स्वामींच्या पाया पडले व आपले दुःख त्यांना सांगितले. त्यांचा मुलगा मरण पावला आहे हे ऐकून स्वामींना आश्चर्य वाटले. स्वामींनी नबाबांना सांगितले तो झोपला आहे, मेला नाही. स्वामींच्या वचनावर नबाबांचा विश्वास बसेना. ती उभयता मुलगा पडला होता तेथे गेली. पाहतात तो मुलगा दुडुदुडु धावत आहे. उभय माता पित्यांना अत्यानंद झाला. त्या मुलाला घेऊन ती उभयता आपल्या मुलाला स्वामींच्या पायावर घालावयास आणले. स्वामींनी गरुडाची प्रार्थना करुन विष उतरवून टाकले होते. आणि मुलाला जीवदान मिळाले. नबाबांनी स्वामींची पूजा केली व ग्रामाचा एक मोठा भूखंड मठासाठी दिला. नबाब पुढील काळात स्वामींचे चाहते झाले.

गदग गावाजवळ किरटिगिरी येथे देसाई जहागिरदार यांच्याकडे स्वामी उतरले. देसाई स्वामींचे भक्त असल्याने पूजेची जय्यत तयारी केली. देसाईना एक पाच वर्षाचा मुलगा होता. स्वामी येथे कधी काळी आलेले पाहून सर्व गाव एकत्र झाले. पूजा फार भव्य झाली. सर्वांना भोजन देण्यात आले. एके दिवशी पाक तयार झाला त्या दिवशी बरीच गर्दी होती. ते आंब्याचे दिवस होते. मोठ्या पिंपात आंबारस तयार करून ठेवीला. दुर्दैव असे की तो लहान बालक खेळता खेळता एका आमरसाच्या पिपांत

पडला. लोकांच्या ध्यानात हे उशीरा आले. पूजेसाठी बसलेल्या देसाईना ती घटना कानावर घातली. त्यांनी तो रस ओतून टाकवयास सांगितला. लोकाना कळू दिले नाही. पूजा चालू ठेविली. स्वामी सर्वांनाच प्रसाद वाटप करीत. देसाई स्वतः आले नाहीत. स्वामी म्हणाले देसाई दंपती प्रसादासाठी आली पाहिजेत. शोकाकुल देसाई दांपत्य स्वामींसमोर उभे राहिले आणि मुलाच्या निधनाचे कथन केले. त्या मुलावर स्वामींनी मंतरलेले पाणी शिंपडले. थोड्याच वेळात तो मुलगा उठून धावू लागला. जनतेत स्वामींबद्दलचा आदर दुणावला व देसाई दांपत्याना परमानंद झाला.

स्वामी तेथून विजापूरला गेले. त्या वेळी आदिलशहा होता. तो विद्वानांची कदर करीत असे व आदराने वागवीत असे. त्याला कला, नृत्य, गान इत्यादी बद्दल आवड होती. सर्व थोर लोकांचा तो आदर करी. त्यांच्या इतमामाप्रमाणे त्यांचा सत्कार करी. विजापूर मुक्कामी स्वामींच्या दर्शनास हजारो भक्त येत असत. ते पूजा व प्रवचनासाठी थांबत असत. वझीराकरवी स्वामींना मोल्यवान वस्तू आदिलशहानी पाठविल्या. एके दिवशी रत्नहार पाठविला. स्वामींनी तो घेतला व हवनात टाकून दिला. वझीरला हा बादशहाच अपमान आहे असे वाटले. ही बातमी त्यानी बादशहाच्या कानावर घातली. बादशहा संतप्त झाला. त्यांनी वझीराला सांगितले, तो हार परत आण. कारण तसाच दुसरा हार करावयाचा आहे. वझीर स्वामींकडे आला व बादशहाचा निरोप सांगितला. स्वामींनी अग्निदेवाकडून तो उज्ज्वल हार परत घेतला आणि वझीरला दिला. हे पाहताच वझीराचा थरकाप झाला. त्याने बादशाहाला सारी हकीकत सांगितली. बादशहला हे संकट वाटले व तो स्वामींकडे आला आणि त्याने लोटांगण घातले, पश्चाताप व्यक्त केला व त्यांची कृपा भाकली. शहावर स्वामींनी कृपा केली. त्यानी पुष्कळ मौल्यवान वस्तू स्वामींना दिल्या. स्वामी विजापूर सोडून जाईपर्यंत त्यांची उत्तम बडदास्त ठेविली.

विजापूरहून अडोणीला स्वामी आले. तेथे वेंकण्णा नावाचा मुलगा स्वामींकडे आला व मला लिहिता वाचता यावे असा स्वामींकडे त्यानी आशीर्वाद मागितला. स्वामीनी त्याच्या डोक्यावर हात ठेविला. अडोनीत बादशाहा व त्याच्या शत्रुपक्षाकडील लोकांचे युध्द चालू होते. तेथे घोडेस्वाराने बादशाहाला एक पत्र दिले. ते वाचवयास कोण बरे आहे असा विचार करीत असतानाच हा वेंकण्णा त्याला दिसला. बादशाहाने त्याला धमकी दिली हे पत्र वाचून दाखव नाहीतर शिक्षा करु. त्या मुलाने स्वामींचे स्मरण केले. तावडतोब त्याला अक्षर ओळख झाली व पत्र वाचले. शत्रूचा पराभव झाला आहे राजधानीत यावे असे पत्र होते ते ऐकून बादशाहा खूष झाला. त्या मुलाला हत्तीवरील अंबारीत बसवून अडोणीला आला. वेंकण्णा तिथे मोठा अधिकारी झाला. यानेच पुढील काळात मनचली (मंत्रालय) जागा मिळवून देण्यात स्वामींना मदत केली.

स्वामी पुनः एकदा अडोणीला आले. त्यांना मठ स्थापनेसाठी कायम स्वरुपाची जागा हवी होती व स्वतःसाठी वृंदावन हवे होते. ते अडोणीली राहिले. दिवाणाने आदर पूर्वक त्यांना राहू दिले. ते पूजापाठ करु लागले. प्रवचने देऊ लागले. हे सारे दिवाणाच्या बंगल्यावरच चालू झाले. लहानपणचा वेंकण्णा आता वेंकटपंत झाला होता व प्रमुख प्रशासक म्हणून काम पाहात होता. त्याचा अधिकार मोठा होता. तसेच बादशाहवर त्याची आदर युक्त छाप होती. हजारो लोक स्वामींच्या दर्शनासाठी येत. स्वामी सर्वांनाच आशीर्वाद देत. व कल्याण चिंतीत ते अत्यंत कारुणिक असल्याने अनेकांची दुःखे नाहीशी करत.

बादशाहाच्या कानावर स्वामींची गोष्ट गेली. साधुसंन्यासी यांची भेट घ्यावी असे त्याला वाटत असे. त्याने पंतांकडे निरोप पाठविला. स्वामीजींशी मला

बोलावयाचे आहे. भेटीची जय्यत तयारी झाली. स्वामींच्या कानावर ही गोष्ट घातली. एक छोटी सभा आयोजित केली. बादशहा लबाड होता. त्याने गोमांस व दारु याचा नजराणा स्वामींकडे पाठविला. हिंदुप्रजाजनांना हे बादशहाचे वागणे आवडले नाही. पण काही बोलू शकत नव्हते. दिवाणाना हे माहीत नव्हते. ते सभा भरविण्याच्या कामात व्यग्र होते. बादशहाने पाठविलेली ताटे पूजेच्या स्थानी आली. नैवद्यासाठी ती ताटे होती. स्वामींनी त्यावर प्रोक्षण केले. व सेवकाना त्या वरील आच्छादने दूर करावयास सांगितले. गोमांस व दारू यांचे रुपांतर उत्कृष्ट फळे व दुधात झाले होते. ते सेवक तिथे थांबू शकले नाहीत. त्यांना स्वामी महाराजांची भीती वाटली. एका दुष्ट स्वप्नातून आपण जागे होत आहोत असे बादशहाला वाटले. त्याचा पण थरकाप झाला. आपल्या लबाडपणाला आता स्वामी योग्य सजा देतील असे वाटले. तो स्वामींच्या पाया पडला, व शिक्षा देण्यास सांगितले. स्वामींनी त्याला आशीर्वाद दिला व हसतच त्याचे कल्याण चिंतिले. बादशहा निम्मी जहागीर सोडून देण्यास तयार झाला. दिवाणाने विनविले स्वीकार व्हावा. तुंगभद्रेच्या तीरी मनचली गाव आहे. ते मठासाठी व वृंदावनासाठी योग्य आहे. तेथे प्रल्हादामुळे ती पवित्र यज्ञ भूमी झाली होती. लंकेला जाताना राम तेथून गेले. अध्यात्म भूमीच्या दृष्टीने ती श्रेष्ठ भूमी आहे असे स्वामींना वाटत होते. इतरांच्या दृष्टीने तो भूभाग उजाड असा होता.

ती जागा बादशहाने आधीच एका मौलवीला दिली होती. ती उजाड भूमी त्याला नकोच होती. स्वामींनी ती भूमी मागितली आणि मौलवीला दुसरी चांगली भूमी दिली. तो खुप झाला. व मनचलीची जागा बादशहाने स्वामींना बहाल केली. स्वामींनी काहींच मागितले नव्हते. दिवाणाने वारंवार विनवणी केल्याने मनचली भूभाग देण्यास त्यांनी सांगितले. दिवाणाला आश्चर्य वाटले इतर चांगल्या जागा सोडून हेच स्वामींनी का पसंत केले बादशहाने ती भूमी स्वामींच्या स्वाधीन केली. स्वामींना आनंद झाला. प्रल्हादापासूनची ठेव प्राप्त झाल्याचे त्यांना समाधान झाले.

**स्वामी परम कारुणिक होते**

स्वामी गरीब श्रीमंत भेद करीत नसत. शिक्षित-अशिक्षित, सर्वांनाच ते समान पाहात व त्यांची दुःखे दूर करत. तंजावरला आवर्षण होते. तिथे पाऊस पडला. आवर्षण दूर केले. अन्नधान्याची टंचाई नष्ट केली. तेथील लोक अद्याप स्वामीजींची आठवण काढतात. स्वामींनी आपल्या आशीर्वादाने खालच्या जातीतल्या कनक याला मोठेपणा प्राप्त करुन दिला. बऱ्याच विद्वानांना हे आवडले नाही. त्यांच्या हयातीत त्यांनी लोकांचे कल्याण केले व वृंदावन प्रवेशानंतर देखील असंख्य लोकांचे कल्याण केले असा अनेकांचा अनुभव आहे.

कनकाचा जन्म एका लाकूडतोड्याच्या कुळात झाला. त्यावेळी तो दूर एका कोपऱ्यात उभा राहिला होता. स्वामी म्हणाले कनका तू दूर का? काय दुर्दैव तुझ्यावर ओढवले आहे. आपल्या नशीबाला हात लावत कनक स्वामींना म्हणाला, मला या जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्त करा. गुरुला त्याने एक मूठभर उडीद दिली. स्वामींनी उडीद स्वीकारली. तेथील उपाध्याय स्वामींजीवर नाराज झाले. हलक्या कुळातील माणासाकडून दान घेणे व अन्नात उडीदाचा अंतर्भाव करणे हे त्याना आवडले नाही. कारण उडीद निषिध्द मानले गेले आहे. स्वामी त्यांच्या अज्ञानाकडे पाहून हसले. हलक्या कुळातील कनकदास श्रेष्ठ देवभक्त आहे व त्याने देणगी देवाला दिली आहे. तेथे उच्चनीच भाग नाही. देवाचा प्रसाद हा सर्वांसाठी असतो. त्या विद्वानांना आपली चूक कळली.

(क्रमशः)

- शं.बा. मठ

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,

ठाणे - ४०० ६०२.

दूरध्वनी : २५३३ २०३०

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा दहावा लेख, विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

## भूमिका

आपण या लेखामध्ये भारतीय संस्कृति तिचे स्वरुप व आत्मा, ज्या वेद बीजावर आधारलेला आहे, त्याची जपणूक व संवर्धन करण्याची कोणती योजना हिंदू समाजाने जपली, त्याचे विवरण करणार आहेत.

## वैशिष्ट्ये

त्या अगोदर, अगदी थोडक्यात ह्या संस्कृतीची कोणती वैशिष्ट्ये जगातील इतर संस्कृत्यांपेक्षा निराळी आहेत, ते बघूया. मग, त्यांतील अतींद्रिय, आध्यात्मिक व सनातन सत्याचा ध्यास कोणत्या बुध्दीने साधला जातो ते पाहू या.


## Creation Theory

विश्वाची निर्मीती (Creation of the universe) व तिचा आकार (Structure) याबद्दल वेदांची व उपनिषदकारांची जी संकल्पना आहे, ती ख्रिश्चन, इस्लाम व ज्यू ह्यांच्या व इतर धर्म व संस्कृत्यापेक्षा निराळी व अत्यंत बांधेसूद, तर्कनिष्ठ व वास्तव आहे. पण, सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे ह्या 'निर्मीती सत्याचा' आधार भारतीय संस्कृतीत जगणाऱ्या सगळ्या पिढ्या व जीवन ह्यांच्यावर पूर्ण प्रभाव टाकून आहे.

आकाश, वायू, अग्नि, पाणी, पृथ्वी अशी क्रमाने होणारी उत्क्रांती ही सूक्ष्मांतून सोपान-शिडी सारख्या मार्गाने जड स्थितीत जाणारी दिशा आहे.

पण, मुख्य मुद्दा हा आहे कीं 'ब्रह्म' या मूळ तत्व संकल्पनेपासून पृथ्वी, निसर्ग, मानव देह, मानवाचे गुणदोष, पिंडप्रकृती, जन्म, मृत्यू, भ्रम, सत्य, ह्या सर्वांची अत्यंत विस्मृत पण बारकाईने मांडणी केलेली इथे सापडेल. ज्यांना ह्या विषयांत जास्त रस आहे त्यांनी श्रीमद्आद्य शंकराचार्य यांच्या 'तत्वबोध' ग्रंथाचे वाचन जरुर करावे. (सेंट्रल चिन्मय मिशन ट्रस्ट, मुंबई यांनी पू. ब्रह्मचारी श्री. स्वरुप चैतन्य यांच्या इंग्रजी टिप्पणी वर श्री. द.स. सहस्त्रबुध्दे यांचा मराठी अनुवाद वाचावा)

त्यांतील दोन चित्रे मुद्दाम जोडली आहेत. आतां या विश्वाच्या रहस्याचा व गूढाचा शोध घेण्याच्या प्रयत्नात वैदिक ऋषींनी कुठून व कां सुरवात केली हे बघणे अत्यंत महत्वाचे ठरेल. शिवाय ही केवळ भौतिक पदार्थांची निर्मीती नव्हे. चैतन्याच्या अनेक दृश्य व गूढ व भाव अवस्था ह्या निर्मीतीत आहेत !!




चित्र नं. १




चित्र नं. २

प्रथम म्हणजे ज्ञानाची त्रिपुटी. ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान म्हणजे knower or Subject, Object and Knowledge ह्या बद्दलचा मूलभूत विचार व ह्यातील पुष्कळशा गोष्टी वाचकांना माहीत असण्याचा संभव आहे. त्यामुळे, त्यांच्या विस्तृत मांडणीपेक्षांही विशेष व गुह्य बाबतींचा आपण विचार करणार आहोत.

## शोधाची दिशा

पहिला शोध हा कीं ह्या ज्ञानाचा शोध समोर दिसणाऱ्या सामान्य, इंद्रियजन्य ज्ञानापासून सुरवात करणे हे चुकीचे ठरेल कारण हे ज्ञान 'भ्रमात्मक' व इंद्रियांच्या क्षमतेबाहेरचे सत्य दर्शवणारे आहे. स्वत: ज्ञाता हा सुध्दा मर्त्य व नाशिवंत आहे.

## आत्मज्ञान आवश्यक

तेव्हां इंद्रियातीत, देह त्रयातीत, अवस्था त्रयातीत अश्या ज्ञानासाठी स्वत:च्या अस्तित्वाचा खरा परिचय होणे जरुर आहे. तेव्हां 'मी कोण आहे' ह्याचा शोध प्रथम घ्यावयाला हवा. तेव्हा 'आत्मज्ञान व आत्मबोध' आवश्यक ठरले.

## शोधाचा अजेंठा

'सत्य' व 'गहन' ह्या Abstract कल्पना ह्या लक्ष ठरल्या. Eternal Truths आणि Operations of the universe हे विषय बनले.

## मार्गदर्शक कंदिल

ह्या नाशिवंत जगाची दृश्ये ही का व कशी भ्रमात्मक आहेत ह्याचे ज्ञान आवश्यक बनले. त्यावर मात करण्यासाठी स्वत:च्याच ज्ञानपध्दतीची चाचणी व माहिती आवश्यक बनली. मानवी देहाची ज्ञानेंद्रिये किती क्षमतेची आहेत व त्यावर मात करण्यासाठी स्वत:च्याच मनाची, अंत:करणाची, बुध्दीची क्षमता वाढवणारी शक्ती जागृती, आवाहन व कार्यरत करण्याची तंत्रे व योगसाधना शोधावी लागली.

## वैदिक मॅन्यूएल

ह्या प्रयत्नात परंपरेनें प्राप्त झालेले 'वेद' ज्ञान उपयोगी पडले. ऋग्वेदातील नारायण ऋषीने रचलेले असे श्रुतीज्ञान 'पुरुषसुक्त' रुपाने जाणीव देत होते कीं हे दिसणारे व्यक्त विश्व फक्त १/४ आहे व अव्यक्त जग ३/४ आहे. ह्या अव्यक्त जगात. ह्या पृथ्वीवर होणारा जीवनव्यवहार हा ह्या जीवांचा श्वास क्रियेवर, अन्नाच्या निर्मीतीवर, ज्ञानक्रियेंच्या मानवी रचनेवर अवलंबून आहे.

## Warning

ह्या विश्वाची एका 'ब्रह्म' तत्वापासून निर्मीतीची सुरवात झाली त्यातच 'मानवी जीव' निर्मीला गेला. तेव्हां ह्या निर्मीती प्रक्रियेपासून तो स्वतंत्र किंवा निराळा नाही.

'पपेट शो' मध्ये बाहुल्या जशा पपेट मास्टरच्या दोरीच्या गुलाम असतात तसाच मानवी जीवन व त्यांचा 'पपेट शो' आहे. फरक एव्हढाच, कीं ह्या बाहुल्यांना आत्मज्ञान व 'स्पिरीच्यूअल स्वातंत्र्य' मिळू शकेल व मिळवावे लागेल. तशी योजनाच ह्या विश्वनिर्मितीत आहे. ह्याला आधार 'श्रीमद् भागवत' आहे.

तेव्हां ह्या बाहुलीला 'आत्मा' नावाची अंतर्गत स्थिती आहे. ते खरे अस्तित्व आहे. पण, त्या जीवाची उत्क्रांती किंवा साक्षात्कारी तत्वाने जसजशी उन्नती होईल तसतशी त्याची जाणीव, ज्ञानाची क्षमता वृध्दिंगत होत जाईल हा वैश्विक प्लॅन आहे.

ह्या पार्श्वभूमीवर त्याच्या सध्याच्या ज्ञानाची पातळी ही भौतिक म्हणजे 'अविद्या' ह्या धर्तीची आहे. आणि, 'विद्या' ही देहातीत, इंद्रियातीत, अव्यक्त जगाच्या ज्ञानाबद्दलची आणि ह्या जीवाच्या आध्यात्मिक उन्नती तत्वावर आधारुन प्राप्त करुन घ्यावयाची आहे.

**भौतिक विज्ञान पद्धति**

आतां, इथे लक्षांत येईल की सध्याची पाश्चात्य वैज्ञानिक पध्दती ही फक्त भौतिक स्तरावरची आहे. नाशिवंत वस्तूबद्दलच्या ज्ञानाची आहे व त्यातील उन्नती भौतिक कक्षेने मर्यादित आहे. Materialist Evolution हे कधीही Spiritual Knowledge किंवा 'विद्या' ह्या तत्वाच्या ज्ञानाकडे मानवाला पोचवूं शकणार नाही. इथे 'अविद्या' तत्वाला अनावश्यक मानले नाही तर ह्या 'अविद्या' व 'विद्या' ह्यांची योग्य सांगड घालण्याचेच आदेश वेदाने व उपनिषदांनी दिलेले आहेत. इशावास्य, मुंडक वगैरे उपनिषदे ह्याबद्दल स्पष्ट दिशा देतात.

मग आतां ह्या 'सत्य' व 'गहन' ज्ञानाकडे पोंचावयाचे कसे? शिवाय, हे प्रश्न, ह्या पृथ्वीवर जन्मणाऱ्या प्रत्येक जीवाला प्रत्येक पिढीत युगानुयुगे पडत रहाणार हे उघड आहे.

ह्याकरितां हे Cosmic Guide वेदज्ञान, जे 'अपौरुषेय' व ईश्वराचे निश्वसित म्हणून आले आहे, ते अव्याहत, शुद्ध व मौखिक स्वरुपात उपलब्ध असावयाला हवे.

**मौखिक**

मौखिक कां ? कारण, लिखीत स्वरुपांत ह्या ज्ञानाच्या कित्येक बारकाव्यांचा लय होतो व ते नष्ट होते. 'वेदांगे व शिक्षा' ही प्रकरणे ह्यासाठी आवश्यक म्हणूनच, 'वेदपठण' ह्याला योग्य महत्व दिले गेले; व गेले ५००० ते १०,००० वर्षे हा ज्ञानाचा चाललेला झरा हिंदू समाजाने अंगिकारिला व संस्कृतीत जिवंत ठेवण्याचा 'भगीरथ प्रयत्न' चालू ठेवला आहे. लक्षांत घ्या कीं अनेक नैसर्गिक आपत्या, परकीय आक्रमणे, सांस्कृतिक हल्ले, राजकीय बदल, आर्थिक संकटे अंगावर येऊनही ह्या भारतीय संस्कृतीने, हा ज्ञानाचा अपौरुषेय ठेवा जीवापलीकडे जतन केला आहे. हा अतुलनीय प्रयत्न आहे.

**वेदश्रुती ज्ञान आवश्यक का ?**

ह्या वेदज्ञानाला प्राथमिक आधारस्तंभ म्हणता येईल. प्रथम, हे अपौरुषेय (मानव निर्मित नव्हे तर ईश्वरानेच दिलेले) ज्ञान आवश्यक कां ठरावे ?

छांदोग्य उपनिषदात याचा विचार केला आहे. समजा, एखाद्या व्यक्तीला डोळे बांधून 'गांधार देशाच्या वैराण जंगलात आणून सोडला-तर त्याला कुठे व का आणला व यातून मार्ग कसा शोधावयाचा याची भ्रांति पडेल.

तसेच जवळजवळ प्रत्येक मानवी जीवाला ह्या पृथ्वीवर कोणत्यातरी आईवडिलांच्या पोटी जन्म घ्यावयाला लागतो. कां ? हे माहीत नाही !! कशासाठी हे माहीत नाही !! ह्या अफाट गहन विश्वात आयुष्याचा कुठचा कार्यक्रम योग्य होईल याच्याविषयी काही कल्पना नाही. हे मर्यादीत आयुष्य संपणार आहेच, याची अंधुक कल्पना

आहे. पण, प्रत्यक्ष तो मृत्यू कधी येतो, कां येतो, याची यत्किंचित कल्पना नाही. तेव्हां ह्या अश्या अनिश्चित अवस्थेत कोणीतरी ह्या अंधार मय जीवनात ज्ञानाचा किरण दाखवेल, अशी आशा तो उराशी बाळगेल तर काही आश्चर्य नाही.

तसेच या 'गांधार देशातल्या माणसाला' ह्या वैराण जंगलात वा बाळवंटात आणल्यावर कुठच्या दिशेला गेल्यास परत गांधार देश सापडेल हे जाणण्याची तीव्र इच्छा व आशा असणारच. क्षितीजापर्यंत नजर टाकूनही काहीही दिसत नाही सांपडत नाही !!

त्याला एखाद्या परोपकारी व ज्ञानी गुरुने हा खरा 'गांधारदेशाचा मार्ग' दाखवला तर तो सुटकेचा श्वास टाकील व लवकरात लवकर व खात्रीने 'गांधारदेशाला' जाऊन पोचेल, नाही कां ? (चतुर्दशखंड-षष्ठ अध्याय-छांदोग्य उपनिषद)

**वैदिक ज्ञानशास्त्र**

स्वामी सत्प्रकाशानंद आपल्या 'Methods of Knowledge' (according to Advaita Vedanta) ह्या ग्रंथात म्हणतात "Though aware of his own existence, man is not aware of his real nature. He is vaguely conscious of the fact that he does not know himself as he is. Sometime or other he likes to ponder on such questions as 'Who am I ? ' 'Where I am from ?', 'Whither am I to go?' ...... It is enigmatic that man with all his pretensions to knowledge does not know himself. Nay, he knows himself wrongly. He identifies himself more or less with any thing other than the self, such as the body, the senses, the mind, the vital principle, the kindreds and even with pets and possessions."

ह्या बाह्य विश्वाला किंवा अंतरंगाला कोण जाणतो व पहातो ? ह्या डोळ्यांनी पाहिलेले कोण पहातो? ह्या कानांनी ऐकलेले कोण ऐकतो ? ह्या स्पर्शेंद्रियांनी जाणलेला स्पर्श कोण जाणतो? ह्या नासिकेने जाणलेला सुगंध कोण जाणतो व उपभोगतो ? ह्या इंद्रियामार्फत कोण खरोखर जाणता व भोक्ता आहे? कारण, ही इंद्रिये तर हळूं हळूं क्षीण होऊन नंतर मृत होणार आहेत. आणि हा जो खरा जाणणारा आहे त्यालाच सत्य ज्ञानाची ओढ आहे. पण सूर्यप्रकाशामुळे जगातल्या वस्तूंचे ज्ञान होते, पण सूर्याला कोणता प्रकाश जाणूं शकतो ? त्यामुळे ह्या विश्वाच्या कोड्याचे उत्तर ज्याला जाणावयाचे आहे त्यालाच पहिले, जाणले पाहीजे. हीच आहे स्वसंवेद्यता !!

**पाश्चात्य भौतिकवादाची असमर्थता**

पाश्चात्य भौतिक विचारांना ह्या खऱ्या प्रश्नांची जाणीव नाही व ह्या प्रश्नांची उकल करणारे तत्वज्ञान, विज्ञान व साधने त्यांच्याकडे नाहीत.

**वैदिक सोल्यूशन**

मग भारतीय तत्वज्ञान, दर्शने ह्यांनी हे कोडे कसें सोडवले?

तर, प्रथम दिशा ही वेदांच्या श्रुती ज्ञानाच्या 'आप्तवाक्याने मिळाली. उपनिषदांनी ही दिशा बुध्दीच्या प्रांगणात व भाषेत आणली. कर्मकांड, ब्राम्हणे, पुराणे त्यांनी ती भावना, हृदय, कल्पना शक्तीच्या प्रांतात आणली. योगाने, तंत्राने, मंत्रानी अनेक सूक्ष्म शक्ति व देवता यांच्या सहाय्याने 'अनुभूतीच्या क्षेत्रात' आणून ठेवली.

ह्या सर्व उपायांत मनाचे सामर्थ्य व एकाग्रता वाढवणे, देहात असतांना देहाबाहेरचे साक्षीत्व मिळवणे वगैरे मार्ग साधनेच्या जोरावर समृध्द केले.

मुण्डकोपनिषद मध्ये एक श्लोक आहे, ज्यावरुन असे दिसते कीं ब्रह्माची उत्पती व ह्या विश्वाची रचना व त्याचा व्यवहार ह्याबद्दल ज्यामुळे ज्ञान होईल ती 'ब्रह्मविद्या' म्हणते 'परा व अपरा विद्या' ह्याचे ज्ञान परमेश्वरामार्फत ब्रह्माला व नंतर महर्षि अथर्वा व त्यापुढे सर्वांना उपलब्ध

होऊ लागले. त्यांतील 'अपरा' विद्या ही भोगांची स्थिती, उपभोगाची साधने व सामग्री ह्याबद्दल आहे. परा विद्या ही 'आगम' आहे व त्या विद्येद्वाराच त्या विश्व रहस्याचा प्रत्यक्षात शोध घेता येतो.

**Present Human Form**

हे सांगण्याचे कारण एव्हढेच की Vedic Epistemology वैदिक ज्ञानशास्त्राचा एक निष्कर्ष हा आहे कीं **''सध्याच्या मानवाला''** ह्या विश्वरहस्याचा पत्ता लागणे व बोध होणे हे दुरापास्त आहे. हे ज्ञान-ब्रह्मविद्येच्या विशेष मार्गानेच उपलब्ध होऊ शकेल. त्याबद्दलचा आधार ह्या 'मुंडक उपनिषदाचा' दिला आहे.

**वैदिक प्रमाण Validity**

स्वामी सत्प्रकाशानंद म्हणतात:- [Verbal Testimony as the means of Suprasensuous knowledge; the speciality of vedic Testimony.]

"Neither sense perception, nor any of the other means of knowledge dependent on it, can impart knowledge of Super sensible facts, e.g. God, Soul, their relation, Soul's Journey after death, heaven, hell, the origin of the universe, merit and demerit accruing from righteous and unrighteous deeds, their fructification, man's highest destiny and it's fulfillment. However, the existence of the Suprasensible cannot be denied.

The explanation of the seen is in the unseen. Perception does not exhaust reality.!!"

"Verbal Testimony (शब्द प्रमाण) is the only vehicle of Suprasensuous knowledge. It preceds intutive perception."

हे सर्व सांगण्याचा हेतू हा कीं 'इंद्रियगोचर ज्ञान प्रकार' हे कधीही इंद्रियातीत, देहातीत ज्ञानापर्यंत व त्या विषयाबद्दल ज्ञान वा बोध देऊ शकणार नाहीत. हे कटु सत्य आजचे 'भौतिक' विज्ञानवादी मानव नाहीत व पचवूं शकत नाहीत. त्याचे कारण त्यांच्या ज्ञानशास्त्राच्या कक्षा ह्या त्यांच्याच भाषेत 'एका पॅरॅमिड' मध्ये बंदिस्त आहेत आणि अहंकारी, अभिनिवेगी आहेत.

त्यामुळे, 'त्यांच्या' सत्यज्ञानाच्या 'पुराण्या-प्रामाण्य' पद्धतीत 'वैदिक 'शब्द' प्रामाण्य'' बसत नाही.

**'शब्द' सांप्रदायिक, योगिक अर्थ**

हा 'शब्द' आकाशतत्वाचा आहे. एक तऱ्हेचा 'नाद'- अथवा वैधिक 'नाद' आहे. सूक्ष्म 'फ्रिक्वेन्सी' (Frequency) म्हणा हवे तर, पण ती भौतिक जातीची नसून मनाच्या स्पंदासारखी, परा जातीची आहे. परा, पश्यन्ति, मध्यमा, वैखरी ही त्याची उतरती भाजणी - चैतन्यातून जडाकडे येणारी आहे. त्यामुळे 'शब्द' हा एक 'Philosophical Jargon Word' आहे. योगिक अर्थ आहे. वैदिक तत्वज्ञान व दर्शन ह्यांतील संकल्पना आहे. 'शब्द' ह्याचा 'सर्वसाधारण' अर्थ इथे अभिप्रेत नाही.

त्यामुळे, व्यक्त, अव्यक्त, परा, अपरा, विद्या, अविद्या, नित्य, अनित्य ह्यातील फरक व त्यांतील नातेसंबंध व समन्वयी अर्थ प्राप्त करणे हे सध्याच्या विज्ञानपध्दतीला अशक्य आहे, पण, मानवाला आवश्यक आहे !!

**वैदिक ज्ञानाचे संक्रमण**

मग, प्रश्न उभा रहातो कीं ह्या भारतीय संस्कृती मधील विलक्षण ज्ञानाचे संक्रमण पुढच्या पिढीला आणि मानवी समाजाला कसे प्राप्त होऊ शकेल.

**१६ संस्कार क्रिया**

ह्याकरितांच ह्याच संस्कृतीमध्ये आणखी एक ठेवा जतन केला आहे. तो म्हणजे 'संस्काराचा' !!

दिशा मासिकाच्या काही मागील अंकात आपण 'गर्भादान विधी', 'जातकर्म विधी' व 'उपनयन', 'विवाह' ह्या संस्काराचा एक धावता उल्लेख केला होता.


ह्या १६ संस्काराच्या पॅकेज मार्फत, ह्या पृथ्वीवर जन्माला येणाऱ्या प्रत्येक जीवाला जन्मापासून ते मृत्यूपर्यंत १०० वर्षाच्या आयुष्यात बायॉलॉजिकली योग्य वेळी, योग्य मुहुर्तावर (Cosmic Time), 'अग्नि' साक्ष व सामर्थ्यामार्फत (ऋग्वेदीयन अग्नि) हे गुप्त संस्कार करण्याची संपूर्ण योजना 'हिंदू' समाजाने यथाशक्ति संभाळली आहे. तिचे महत्व आज जाणले जात नाही हा खेद आहे.

पण, ह्या 'हिंदू समाजाची सुध्दा ही क्षमता, या संस्काराच्या ज्ञानाची, (प्रयोगाची) 'सातत्यक्रिया' टिकवण्यावर अवलंबून आहे.


त्यातील प्रत्येक संस्काराच्या दोन बाजू आहेत. एक भाग, म्हणजे दृश्य, बाह्यात्कारी, नाट्यमय भावना उद्युक्त करणारा, श्रध्देवर आधारलेला धर्मसंस्काराचा (रिच्यूअलचा) भाग. (हा निव्वळ बाजारी व नाटकी प्रकार होऊन बसला आहे. मूळ हेतूच्या वर आधारलेला श्रध्देचे 'एक्सप्लॉयटेशन' व विकृतिकरण (Exploitation, Perversion आहे.)

**Spiritual movements**

दूसरा भाग, हा 'Inner Spirtual Movements' 'अंतर्गत आध्यात्मिक साधना व कर्म' ह्यावर आधारलेला आहे. त्याला अंत:करण शुध्दि अनिवार्य व अभिप्रेत आहे. ह्या संस्कारात ह्या ऋग्वेदीयन वैदिक अग्निची 'हजेरी' आवश्यक आहे. तिचे 'आवाहन' व 'निर्गमन' आणि 'विसर्जन' ह्याचे 'मंत्र' चैतन्यसुक्ष्म व 'नादानुसंधान' साधणारे असावयाला हवेत. ह्या सर्वाचे पौरोहित्य हे साक्षात्कारी, आध्यात्मिक योग्याचे असावयाला हवे.



चित्र नं. ३



चित्र नं. ४

**उपनयन संस्कार**

अश्या एका प्रमुख संस्काराचा विचार आपण करुया. हा आहे 'उपनयन संस्कार'. (चित्र नं. ३ व ४)

ह्या संस्काराचे वर्णन-मंत्रासहित 'संस्कार विधी:' ह्या महर्षि दयानंद सरस्वती यांच्या ग्रंथात मिळेल.

हा संस्कार बालवयात साधारण ८व्या वर्षी करावयाला हवा. ज्या जीवावर हा संस्कार करावयाचा त्याची मनाची, शरीराची, अंत:करणाची अनुकुलता प्राप्त

करण्यासाठी योजना आहे ईश्वरस्तुती, प्रार्थनोपासना, स्वस्तिवाचन, शांतिकरण पाठ, समिदाधान व मुख्य म्हणजे 'अग्न्याधान'.

**अग्न्याध्यान**

काय आहे हे 'अग्न्याधान'? त्याचा मंत्र आहे

ओम् भूर्भुव: स्वर्द्यौरिव भूम्ना पृथिवी व प्वरिम्णा ।

तस्यास्ते पृथिवी देवयजनि पृष्ठेऽग्निमन्नादमन्नाद्यायादधे ॥१॥
यजु. अ. ३ । मं. ५॥

पुढचा मंत्र व्यजनाने अग्नि प्रदीप्त करताना

ओं उद्‌बुध्दस्वाग्ने प्रति जागृहि त्वमिष्टापूर्ते सँ
सृजेथामयं च॥

अस्मिन्त्सधस्थे अध्युत्तरस्मिन् विश्वे देवा
यजमानश्च सीदत ॥२॥
यजु. अ. १५ मं ५४॥

पुढे पुष्कळ मंत्र आहेत. नमुन्यादाखल काही इथे लिहीले आहेत.

त्यानंतर आज्याहुती, प्राज्यापत्याहुति अश्या मंत्रयुक्त क्रिया आहेत.

यज्ञ समिधा ह्या पलाश, शमी, पीपल, वड, गुलर (औदुंबर) आंबा, बिल्व वगैरेच्या आहेत. होम, द्रव्य सुध्दा निश्चित आहेत. कस्तुरी, केशर, तगर, श्वेतचंदन, वेलदोडा, जायफळ, जावित्री, तूप, दूध, गहू, उडिद वगैरे वगैरे.

प्रश्न हा आहे कीं ही योजना काही 'आयुर्वेदीय' तत्वांवर व ह्या वस्तूंच्या ठायी असलेल्या आध्यात्मिक उर्जेच्या आवाहन किंवा उत्तेजक गुणांवर आधारलेल्या आहेत कां ? याची जिज्ञासा व शोध आवश्यक वाटावा इतके हे विस्तृत 'डिझाईन' आहे. 'इंटलिजंट डिझाईन' (Intelligent Design) आहे.

**मेधाजनन पळस वृक्ष**

ह्या उपनयन विधी मध्ये पळस वृक्षाबद्दल 'मेधाजनन' क्रियेत एक वचन 'मेधा सुक्त' मध्ये आहे.

"हे पळसवृक्षा तू जसा ब्रह्मज्ञानाचा उत्तम श्रोता आहेस तसा मला कर."

म्हणूनच हा '**पळस दंड**' बटूला दिला जातो तसाच तो संन्याश्यालाही दिला आहे. **(सध्या तो विमानप्रवासाला निषीध्द आहे - आतंकवादी आहे!!)**

बटूला 'गायत्री मंत्राची शिक्षा दिली जाते. काय आहे ही योजना ?" 'भर्गो: देवस्य धीमहि ॥" सूर्य ह्या आध्यात्मिक सविता सूक्तापासून धी, मेधा-बुध्दीचा एक विशिष्ट प्रकाराची देणगी, प्रसादाची प्रार्थना व याचना केली जाते. सूर्यापाशी कां ?

**डॉ. थत्रे व गायत्री छंद**

सोबत एक चित्र आहे. (Gayatri. BMP) हे डॉ. आर, पी. थत्रे ह्यांच्या संशोधनावर आधारलेले आहे.

सूर्यापासून ज्या निरनिराळ्या शक्ति निर्माण होऊन पृथ्वीवर व जगतावर वर्षाव करत असतात त्यांचे वाहन वैदिक ८ छंदातून होत असते. ते छंद जगति, त्रिष्टूप, गायत्री, उष्णिगन, बृहति, अनुष्टूप वगैरे आहेत.

वेदातील ऋचाही ह्या छदांवर रचल्या आहेत कारण त्या ऋचांना हे मंत्रसामर्थ्य-अव्यक्तातील वहनशक्ति आवाहनशक्ति प्राप्त व्हावी म्हणून !!

तेव्हां 'मेधा' शक्तिची प्राप्ती हवी असल्यास साधकाला किंवा या इथे बटूला (त्याच्या ८ व्या वर्षीच) ही गायत्री साधना दिली जाते. त्यामुळे Supersensuous इंद्रियातीत असे ज्ञान प्राप्त होऊ शकते.

वेदातील अनेक क्रिया व विधी आपल्या पिढीपर्यंत शुध्द स्वरुपात पोंचल्या नाहीत. ह्या

'आगमशास्त्र' च्या जातीच्या आहेत आणि त्यांतील वैश्विक रहस्यावर आधारलेल्या, कित्येक योगिक, अंतरंग चतुष्टय(मन, बुध्दि, अहंकार, चित्त) यावर आधारलेल्या क्रिया व त्याचे पूर्ण ज्ञान लुप्त झाल्याने समाजाने त्यांचे फक्त दर्शनी व बाह्य स्वरुप संभाळले. कां? त्याची अनेक कारणे आहेत. पण ह्या क्रियांची जी वर्णने व संहिता आज उपलब्ध आहेत त्याचा अर्थ लावण्यात अडचणी आहेत. ह्या अडचणी Philology ह्या शास्त्रात आज चर्चिल्या जात आहेत. अनेक शब्दांचे अर्थ लावताना त्यांच्या ज्या अनेक पध्दती आहेत त्याचे ज्ञान आवश्यक आहे. केवळ व्याकरण शास्त्र ह्यावर आधारलेले अर्थ खरा बोध देऊ शकत नाहीत.

''**भावार्थ, संप्रदायार्थ, निगमोक्ष, सर्वरहस्य, भौतिक, महतत्वार्थ** असे सहा पद्धतिचे अर्थ गंधर्वतंत्रात सांगितले आहेत. 'गायत्री मंत्र व उपासना' ह्या श्री. देवधर यांच्या पुस्तकात त्याची सविस्तर, सुबोध चर्चा केलेली आढळेल.

पण, महायोगी श्री. अरविंद घोष (पाँडिचेरी) ह्यांनी वेदरहस्यावर जे संशोधनात्मक ग्रंथ लिहीले आहेत. त्यांत ह्या रहस्य उलगडण्याच्या मार्गाचे कथन केले आहे. वेदिक ऋषींना प्रत्येक ऋचा ह्या दोन अर्थाने बांधाव्या लागल्या. एक त्या ऋचेचा व्यावहारिक किंवा पृष्ठभागावरचा अर्थ व दुसरा त्या क्रियेचा योगिक इंद्रियातीत, देहातीत स्वरुपावर आधारलेला अर्थ. कारण ज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणे हा 'अरुपाचे रुप' केवळ शब्दांच्या माध्ममातून दाखवण्याच्या अडचणीवर मात करण्याची 'युशक्ति' योजना होय.

**डॉ. डोंगरे, स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर**

आमच्या 'स्पिरीच्यूअल सायन्स सेंटर' चे एक ज्येष्ठ साधक डॉ. धनंजय डोंगरे (मुलुंड) यांनी काही आवश्यक 'शब्दाचे' अर्थ कसे लावले आहेत त्याची माहिती दिली व त्यामुळे मूळ क्रियांना कसा अर्थबोध प्राप्त झाला त्याची नमूण्यादाखल उदाहरणे देतो.

'उपनयन' ह्या शब्दाचा अर्थ योगरुढ पध्दतीने लावावयाला हवा. योगरुढ म्हणजे 'having an etymoloical as well as special or convenient meaning (पंकज = चिखलात जन्मलेले उगवलेले पण योगरुढ अर्थ = कमळ ) उपनयन हा नुसता एक शब्द नसून तो एक विधी आहे. इथे 'उप' याचा 'सान्निध्य' असा अर्थ लावून 'गुरुच्या सान्निध्यांत' असा अर्थ सर्वसाधारणपणे लावलेला आढळेल. पण, 'नय' म्हणजे योजना, उपाय, शास्त्र, पंथ दाखविणारा, असाही आहे. कोणता हा पंथ, उपाय व योजना ?

हा लहान जीव जेव्हां गुरुकुलात प्रवेश करतो तेव्हां त्याला एका 'व्रतशील' जीवनाचा आरंभ करावयाचा असतो. त्यामुळे त्याला कशाची प्राप्ती होणार व ते ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी ज्या शारिरीक, मानसिक व बौध्दिक वैशिष्ट्यांची नितांत आवश्यकता असते, त्यांची कल्पना, 'अधिकारी' सिध्द गुरुकडून प्राप्त होते. ह्या क्रियेची, तंत्राची, दीक्षा ज्या गुरुकडे परमेश्वराचे 'निश्वसित ज्ञान' प्रत्यक्ष उपलब्ध आहे अशाकडून होणार असते. त्या क्रिया व ज्ञानबोध 'आत्मानुभवात' आणण्यासाठी लागणारी ही संस्कार क्रिया आहे म्हणून तो बटू 'द्विज' म्हणजे दूसरा जन्म पावतो.

आपण असे पाहिले की प्रत्येक मानवी जीवाला ह्या पृथ्वीवर जन्माला आल्यावर स्वत:वर संस्कार व योगक्रिया करुन आपली उन्नति व मूलगामी बदल करण्याचे स्वतंत्र आहे. तो नुसता 'भोगी' जीवन जगला तर तो प्राणीजीवनाची पातळी उंचावू शकणार नाही. तेव्हां त्यातला एक बदल त्याच्या बुध्दीच्या, अंतकरणाच्या सामर्थ्यांत व पातळीवर करण्याच्या प्रकारचा आहे. हा बदल 'मूलगामी' आहे. ह्या शरीरामार्फतच व पृथ्वीच्या ग्रहावर उपलब्ध साधन व वैश्विक निसर्ग शक्तिंच्या मार्फत होणार आहे. हा बदल आहे 'मेधा' ह्या संज्ञेने प्रतीत होणाऱ्या वैशिष्ट्याचा. डॉ. डोंगरे म्हणतात,

''महाभारताच्या अनुशासन पर्वात भीष्माचार्य युधिष्ठिराला एक उपदेश करतात (अध्याय ३४). त्याचा मतीतार्थ हा कीं 'ब्राह्मण जो धर्माला-वेदाला जाणतो, तो केवळ 'मेधेच्या' योगाने. ह्या 'मेधेने' ह्याचा काय अर्थ करावयाचा, काय समजायचे ? बुध्दीचा हा कोणता प्रकार ?

'मेधा' शब्द (नाम) मेध ह्या धातूपासून बनला आहे. 'अमरकोश' त्या मेधेचा अर्थ 'संगमे (भ्वा.उ.से.), धी-धारणावती मेधा. ''मेधते संगच्छते सर्वमस्याम्।'' म्हणजे आपण ज्याप्रमाणे गंगेला येऊन मिळणाऱ्या नद्या ह्या संगमानंतर 'गंगेच्याच स्वरुपाला, पावित्र्याला पात्र होतात, असे जाणतो. त्याप्रमाणे धर्म, वेद यांचा उगम ज्यापासून त्या वैश्विक शक्तिपाशी - भगवंताशी. ज्याची बुद्धी जाऊन विसावली, त्यालाच परमात्म्याने सांगितलेल्या धर्मांचे यथातथ्य ज्ञान होते.''

आता, अर्थ लावण्याच्या ज्या पद्धती आहेत, त्यामध्ये ज्या शब्दाच्या मार्फत एखादी विशेष पध्दती साकारली जाते व विशेष फल मिळते, त्या अर्थाकडे लक्ष द्यावयास हवे नाही कां? 'गायत्री मध्ये 'प्रार्थना' आहे व प्रत्यक्ष 'क्रिया' सुध्दा आहे. गुरुकुलात 'उपनयन' विधी हा 'गायत्री छंदामार्फत' सूर्यापासून येणाऱ्या किरणांमार्फत 'मेधा' ह्या बुध्दीच्या एका वैशिष्ट्याची, शक्तीची, सामर्थ्याची प्राप्ती करणार आहेत हा संदर्भ-आध्यात्मिक संदर्भ' हा ह्या क्रियेचा 'प्राण' आहे. ही सर्वसाधारण 'भौतिक' प्राप्ती नव्हे, तर ह्या क्रियेने (योग, मुद्रा, ध्यान, नादानुसंधान वगैरे) त्या बटूच्या 'बुध्दीवर' असा काही 'संस्कार' (कायम प्रवृत्ती बदल) होणार आहे कीं त्याला एका भौतिक व्यवहारापलीकडील 'अव्यक्त जीवनातही' नेता येईल अशी एक कॉंशसनेसमध्ये मूलगामी बदल करणारी प्रवृत्ती शक्ती (Attribute) मिळणार आहे. ही 'आध्यात्मिक उन्नति साठी एक साधन क्रिया आहे. हा भारतीय संस्कृतिचा हेतू आहे व हा 'उपनयन' ह्या संस्काराचा खरा अर्थ आहे. शिवाय हे या जीवनात व पुढील वैश्विक प्रवासातले 'व्रताचरण' आहे.

### उपनयनाचा हेतू व संशोधन

गंमत ही आहे कीं 'उपनयन' ह्या संस्काराचा हेतू समजला तर त्या संस्काराच्या क्रियेबद्दल उत्सुकता व आस्था निर्माण होईल. आणि, जर ह्या हेतूची प्रत्यक्षात पूर्ती व्हावी अशी दुर्दम्य इच्छा प्रगट झाली तर त्या क्रियेच्या यशस्वितेबद्दल खात्री पटण्याची इच्छा निर्माण होईल. मग, जर त्या क्रियेमध्ये काही कमीजास्त रहस्ये लपून राहिली असतील तर ती उलगडावी व त्याबद्दल 'खरे ज्ञान व्हावे व खऱ्या मार्गदर्शनाची आकांक्षा निर्माण होईल. आज ह्या सर्व प्रक्रिया मृत आहेत!!

### राजकारण

पण, संस्कृतिचा फक्त देखावा आणि तोही वरवरचा व वृथा अभिनिर्वेश बाळगून रहाणारा त्याचा फक्त राजकीय हेतूच वापरावा, हा जो सध्याचा सामाजिक भाव आहे, त्या मंडळींनी ह्या संस्कृतीच्या खऱ्या अतुलनीय वैश्विक आवाक्याची थोडी तरी जाणीव ठेवावी व त्या शिक्षणाचाही राजकीय हेतूमध्ये सामाजिक क्रांतीमध्ये अंतर्भाव करावा, एव्हढाच प्रामाणिक हेतू या लेखांमागे आहे. ही परंपरा बाळगणाऱ्या हिंदूसमाजाची जी 'ग्लोबल भौतिक क्षेत्रामध्ये' अवहेलना होते आहे व भारतातही 'शिक्षण उद्दिष्टांच्या बदलासाठी झालेल्या प्रयत्नाचा आवाका व त्याची दुर्दशा झाली, त्या संदर्भात ह्या विचारांचा मागोवा घ्यावा हा हेतू आहे. यापुढेही आणखी कोणत्या साधना व भूमिका या संस्कृतिने संभाळल्या आहेत ते पुढच्या लेखांत बघुया !!

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट
अग्यारी लेन, ठाणे - ४००६०१.
टे. नं. २५३६८४५०
E-mail : yrsane@eth.net Mbl : 9892046539

# 'दिशा' इतिहास संशोधनाच्या

*पुराभिलेख खात्यातील सेवेमुळे इतिहासाचा संशोधन, संशोधनपरसाहित्य याविषयी व्यक्त झालेले अभ्यासपूर्ण विचार या लेखात (भाषणात) वाचावयास मिळतील! - संपादक*

इतिहास विषया संबंधित असलेल्या पुराभिलेख विभागात पस्तीस वर्षे सेवा केल्यामुळे व मोठमोठ्या इतिहास तज्ज्ञांचा सहवास व मार्गदर्शन लाभल्यामुळे जे काही थोडे फार इतिहासा विषयी ज्ञान मला प्राप्त झाले आहे ते सांगण्यासाठी आज या ठिकाणी तुम्ही मला संधी दिली त्याबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहे.

मी फार मोठा इतिहास तज्ज्ञ नाही. थोडे फार ऐतिहासिक संशोधन केले आहे, संशोधन पर लेखन केले आहे आणि महाराष्ट्र इतिहास परिषदेत निबंध वाचन केले आहे. त्या आधारे माझे इतिहासासंबंधीचे विचार मांडण्याचे मी या ठिकाणी धारिष्ट्य करीत आहे.

इतिहासाशी आपला सर्वांचा नेहमी संबंध येतो किंवा त्याच्याशी आपली बरीच ओळख आहे.दोन मित्र खूप दिवसांनी एकमेकांना भेटतात. एकजण दुसऱ्याला म्हणतो "का रे इतके दिवस कोठे होतास? दिसलास नाहीस, भेटला नाहीस, काहीच खबर नाही?" तेव्हा दुसरा म्हणतो, "अरे बाबा गेल्या काही दिवसात माझ्या बाबतीत मोठा इतिहास घडला" आणि तो घडलेला इतिहास सांगतो. तर अशी ही इतिहासाची आपली पहिली ओळख. फक्त फरक एवढाच की ही ओळख स्वतःपुरती.

ज्याला खऱ्या अर्थाने इतिहास म्हणतात तो राष्ट्राचा, देशाचा, संस्कृतीचा. आपण सर्व मध्यम वर्गातील माणसे, पेशा नोकरीचा. आयुष्याचा निम्याहून अधिक काळ नोकरीत गेलेला. निवृत्तीनंतर हाच काळ वर सांगितल्याप्रमाणे आपल्या पुरता इतिहास बनत नाही का? या काळाच्या चांगल्या वाईट अनंत आठवणी तुमच्या आमच्या मनांत कायम वास्तव्य करून बसल्या आहेत. याच आठवणी शब्दरुपाने कागदावर लिहून ठेवल्या की झाला इतिहास. <u>शेवटी इतिहास म्हणजे काय तर जे घडले ते शब्दरुपाने कागदावर लिहून ठेवले म्हणजे कालांतराने त्याचा झाला 'इतिहास'.</u>

हा इतिहास रम्य आहे. आपल्या पूर्वजांच्या विजयांचा आणि पराभवांचा, पुण्याचा आणि पापांचा, सद्‌गुणांचा दुर्गुणांचा, त्यांच्या भावनांचा, विकारांचा, ज्ञानाचा आणि अज्ञानाचा. तो वास्तवपूर्ण आहे. त्यात रुक्षता नाही. तो रम्य आहे, स्फूर्तिप्रद आहे, बोधप्रद आहे. इतिहास हा गतकाळाचा साक्षीदार आणि भावी काळाचा वाटाड्या आहे. तो सारखा आपल्या बरोबर वाट चालत असतो. गत काळातील दुर्गुण, चुका, दुष्कृत्ये आणि पराभव तो आपल्याला सांगतोच - वेळोवेळी तांबडे दिवे दाखवतो आणि गत काळातील विजयाचे पराक्रमाचे आणि सत्कृत्यांचे पोवाडेही तो गातो. अशा इतिहासामुळेच ऐतिहासिक ग्रंथ निर्माण झाले, ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आणि त्यांनी वाचकांच्या मनावर आपला पगडा बसविला, त्यांच्या आवृत्या निघाल्या आणि अजूनही निघत आहेत.

पुराभिलेख खात्यात सेवा करीत असता आमचे जे संचालक होते ते स्वतः मध्ययुगीन इतिहासाचे आणि नाणक शास्त्राचे गाढे व्यासंगी होते. नुकतेच त्यांचे निधन झाले. त्यांच्याकडे नेहमी इतिहास शास्त्राच्या निरनिराळ्या विषयांच्या तज्ज्ञ व्यक्ती येत असत. त्यातील प्रमुख म्हणजे महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार. आचार्य अत्रे यांचा

उल्लेख महाराष्ट्राचा पुराण पुरुष, महाराष्ट्राचा चालता बोलता इतिहास करीत असत. महाराष्ट्र भाषा भूषण ज. र. आजगावकर - संत आणि संत वाङ्मय इतिहास सांगणारी अधिकारी व्यक्ती; श्री. ब्राझ फर्नांडीस - मुंबईच्या आणि वसईच्या पुरातन इतिहासावर बोलणारी अधिकारी वाणी, डॉ. मोतीचंद्र मुंबईच्या प्रिन्स ऑफ् वेल्स म्युझियमचे माजी संचालक, म्युझिऑलॉजी या विषयात देशात आणि परदेशात प्रसिद्ध डॉ. एच्. डी. सांकलिया - पुण्याच्या डेक्कन कॉलजचे माजी संचालक आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुरातत्त्व विषयाचे गाढे व्यासंगी, डॉ. ग. ह. खेर -इतिहास पुरातत्त्व, नाणकशास्त्र, मूर्तीविज्ञान अशा इतिहास विषयक विविध अंगांचे संपूर्ण ज्ञान असलेली छोटी पण मोठी व्यक्ती प्रा. न. र. फाटक, साहित्य, इतिहास, पत्रकारिता अशा विविध विषयांचे संपूर्ण ज्ञानाचे कोठार असलेले चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व, श्री. एम्. सी. छगला - न्याय आणि सामाजिक समस्यावर प्रकाश पाडणारे प्रसिद्ध न्यायमूर्ती, डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव. दिल्ली विद्यापीठाचे माजी उपकुलगुरु आणि आर्थिक विषयावरचे तज्ज्ञ. आपआपल्या क्षेत्रात नावाजलेल्या अशा या व्यक्ती आमच्या संचालकांकडे वारंवार येत असत, आपले विचार मांडीत असत, चर्चा करीत असत, वादविवाद करीत असत व हे सर्व मी व माझे सहकारी ऐकत असत. हे सर्व शब्दरूपाने लिहून ठेवले असते तर तो सर्व विषयांचा इतिहास झाला असता. तेव्हा सांगण्याचा मतलब असा की अशा रीतीने इतिहास घडतो, तयार होतो. मोगल बादशहांच्या पदरी लेखनिक असत. ते बादशहाची व राज्यासंबंधीची रोजची माहिती लिहून ठेवीत असत. या माहितीच्या आधारेच मोगल साम्राज्याचा इतिहास तयार झाला. आपल्याकडे बखरी, शकावल्या, जुनी कागदपत्रे यांच्या आधाराने मराठी साम्राज्याचा इतिहास लिहिला गेला.

इतिहास म्हणजे नुसत्या लढाया, सनावल्या, राजांची घराणी, त्यांची माहिती हे नसून त्या काळाचे रीतीरिवाज, राजकारणे, बोलीभाषा, सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरे, लोकोपयोगी कामे, परराष्ट्र धोरण, पत्रव्यवहार यांचे तंतोतंत दर्शन घडविणारे जे चित्र तोच इतिहास. हा इतिहास आपण ज्यावेळी वाचतो, त्याचा अभ्यास करतो किंवा त्याचे संशोधन करतो ते कशाच्या तरी आधाराने किंवा पुराव्याने करतो. ते आधार किंवा पुरावे म्हणजे ऐतिहासिक घराण्यांकडे असलेली जुनी कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख, नाणी, बखरी इत्यादी. या सर्व साधनांच्या अभ्यासामुळे आपल्याला आपल्या राष्ट्राचा आणि परराष्ट्रांचा इतिहास ज्ञात होतो.

वरील विवेचनावरून आपल्या ध्यानात आले असेल की इतिहास हे शास्त्र आहे. त्या विषयी संशोधन, रचना व अभ्यास शास्त्रीय पद्धतीने व्हावयास पाहिजे. कागद पत्रांचा शोध कसा करावयाचा, त्यांचा संग्रह कसा करावयाचा, त्यांचे संशोधन कसे करावयाचे व त्यावरुन ऐतिहासिक गोष्टींची सत्यता कशी ठरवावयाची या विषयी चिकित्सक बुद्धीने संशोधन व्हावयास हवे. प्राचीन काळी घडलेल्या गोष्टींपैकी संभवनीय भाग कोणता व महत्त्वाचा भाग कोणता हे ठरवावे लागते. म्हणून इतिहासकाराचे कर्तव्य एवढेच की असलेल्या निरनिराळ्या पुराव्यांवरून तात्पर्य काय निघते ते पाहणे आणि त्या अनुषंगाने इतिहासाची रचना करणे, इतिहास लिहिणे. इतिहासाचा हेतू सत्यान्वेषण सत्यसंशोधन व सत्य प्राप्ती असा असावयास पाहिजे.

इतिहास हा कागद पत्रांच्या सहाय्याने लिहिला जातो. परंतु असे आढळते की मागील लोकांच्या विचाराचे कृतीचे राजकारणाचे सामाजिक व आर्थिक स्थित्यंतराचे ज्ञान ज्या कागद पत्रावरून समजते त्या कागदपत्रांची नीट काळजी घेतली जात नाही. उदा. कसरीने, वाळवीने कागद खाणे, रद्दी सारखा त्यांचा उपयोग करणे; त्यांची योग्य वेळी उस्तवार न केल्याने ते कुजून जाणे; त्यांची किंमत न समजल्याने ते निरोपयोगी समजून जाळून टाकणे; झुरळांनी

चुराडा करणे इत्यादी. यामुळे काय झाले तर देशाचा, राष्ट्राचा किंबहुना मानव जातीचा खूप काळाचा इतिहास नाहीसा झाला आहे आणि त्यामुळे इतिहासशास्त्राचे फार मोठे व कल्पनातीत नुकसान झाले आहे.

वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की कागदपत्र हे इतिहासाचे प्राण आहेत. आणि हे प्राण निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेले आहेत. संस्थानिकांच्या दप्तरात आहेत. जुन्या घराण्यांच्या फडताळात कुजत पडले आहेत. जुनी सरदार घराणी, जहागिरदार, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, जोशी, धर्माधिकारी यांच्याकडे आहेत. त्यांचा शोध करावयास पाहिजे. या लोकांशी संपर्क साधावयास पाहिजे. शक्यतो त्यांचेकडून कागद मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न करावयास हवे. ते नाही जर जमले तर निदान त्यांच्या झेरॉक्स प्रती काढाव्या लागतील. यासाठी मनुष्यबळ व द्रव्यबळ जवळ असावयास पाहिजे. कारण काही वेळा द्रव्य खर्चून कागद विकत घ्यावे लागतात. झेरॉक्स प्रती करणे न जमल्यास त्यांच्या हाताने नकला करून घेतल्या पाहिजे. त्यासाठी ते कागद कोणत्या लिपीत लिहिले आहेत, कोणत्या भाषेत लिहिले आहेत. त्याचे ज्ञान नकल करणाऱ्यास व कागदांचा संग्रह करणाऱ्यास अवश्य असावयास पाहिजे. हे सर्व झाल्यावर या कागदांचा योग्य रीतीने संग्रह करणे, त्यांची निगा राखणे, सूचीपत्रे तयार करणे, पत्रांचे गोषवारे छापून प्रसिद्ध करणे ही कामे ओघाने येतात.

हे कागदपत्र प्रसिध्द करण्यापूर्वी इतिहासकाराला सुसंबद्ध इतिहास लिहिण्यासाठी नीतीशास्त्र, कायदेशास्त्र, राजनीतीशास्त्र, भाषा, तत्त्वज्ञान, संस्कृती, आर्थिकशास्त्र इत्यादी आणि निरनिराळ्या इतिहासकारांनी लिहिलेले ग्रंथ यांचे ज्ञान आवश्यक आहे. कारण इतिहासकार तोच जो शास्त्रीय पद्धतीने कागद पत्रातील माहितीचे परीक्षण करून खऱ्या बुद्धीने खरा इतिहास लिहितो. नुसत्या तर्कावर व अनुमानावर लिहिलेला इतिहास खरा नाही. संशोधकांना तो मार्गदर्शन करू शकत नाही.

ऐतिहासिक ज्ञानाचे स्वरुप अप्रत्यक्ष रीतीने म्हणजे कागदपत्रांच्या सहाय्याने होत असते. कागदपत्रापासून त्यात लिहिलेल्या ऐतिहासिक गोष्टीविषयी अनुमान काढणे व निर्णय घेणे. ही कामे फार सावधगिरीने करावयास पाहिजे. या संबंधी तज्ञांबरोबर चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु एखाद्याला जुन्या कागदपत्रांचे घबाड सापडल्यावर किंवा मिळाल्यावर आपणच ते वाचून व आपल्या नावावर छापून सर्व श्रेय स्वतःकडे घेण्याचा कल असल्याने घाईघाईत त्याचे वाचन करून ते छापल्यामुळे होते काय तर त्यात खूप चुका, भाषांतर नीट झालेले नसते, काळाचा मेळ बसत नाही, त्यातील व्यक्तीची नीट ओळख होत नाही इत्यादी.

कागदपत्र सापडण्यापूर्वी व सापडल्यावर हातात आल्यावर तो कोणी लिहिला आहे. कधी लिहिला आहे व कोठे लिहिला आहे. हे प्रश्न प्रथम येतात. पूर्वीच्या काळी कागदावर सही नसे. पुष्कळ कागदपत्रावर तारीख मिळते तर ठिकाण नसते. ठिकाण मिळते तर कर्त्याचे नाव नसते. लेखकाचा दर्जा लौकिक, स्वभाव, विद्वता पत्रातील मजकूरावरून समजते. त्यासाठी या गोष्टी संबंधी बारीक सारीक जितकी माहिती मिळेल तितकी हवी असते कारण त्यावरून कागदपत्रांचा खरेखोटेपण करण्यास मदत मिळते.

मागील काळातील कागदपत्र कोठले आहेत. ते कधीचे आहेत, त्यांचे मूळ काय व त्यांचा कर्ता कोण हे शोधून काढल्यावर त्यांची माहिती एकत्र करणे व त्यांचे वर्गीकरण करणे, मिळालेली निरनिराळ्या प्रकारची माहिती व्यवस्थित लावून तिचा प्रसंगानुरुप उपयोग करणे हे इतिहासकाराचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. या माहितीचा उपयोग करता यावा म्हणून तिची टिप्पणे करणे. वाचताना जे कागदपत्र येतील त्यांची अनुक्रमाने टिप्पणे करुन त्यांचा

उपयोग करणे. काही इतिहासकार आपल्या स्मरणशक्तीच्या सहाय्याने माहिती स्मरणात ठेवतात व लागेल तेव्हा तिचा उपयोग करतात. तर काही संशोधक निरनिराळ्या कागदांच्या कपट्यावर माहिती लिहितात व ती जुळवून व्यवस्थित लावतात. हीच पध्दत सध्या प्रचारात आहे. संशोधनासाठी कागदपत्र कालानुक्रम, विषयानुक्रम व वर्णानुक्रम या पद्धतीने लावतात. यात मुख्य अडचण कालानुक्रमाने कागद लावण्यात आहे कारण काही कागदामध्ये तारीख नसते, अशा वेळी कागद कोणी व कोणाला लिहिला. व आतील मजकुराच्या सहाय्याने काळाचे अनुमान करता येते. तसेच काही वेळा एकाच नावाचे दोन किंवा तीन इसम आढळतात. कारण पूर्वीच्या काळी आडनाव लिहीत नसत. अशा वेळी कागदातील मजकूराचा खोल विचार व संशोधन करुन ज्याच्या संबंधी पत्र सनद हुकुमनामा आज्ञापत्र आहे तो इसम ओळखता येतो.

इतिहास कसा तयार होतो हे ध्यानात आल्यानंतर ज्या वेळी आपण तो वाचतो, त्याचा अभ्यास करतो किंवा त्याचे संशोधन करतो ते ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे करतो. या कागदावरुन राज्याराज्यामधील परिस्थितीचे राजकारणी डावपेचाचे, आर्थिक घडामोडी सामाजिक स्थित्यंतरे, रीतिरिवाज इत्यादी अनेक विषयांची माहिती मिळते. या कागदपत्रात पत्रे, आज्ञापत्रे, वतनपत्रे, निवाडापत्रे, सनदा, महजरा हुकुमनामे जाहीरनामे असे अनेक प्रकारचे कागद असतात. या पत्रावर छत्रपती व प्रधान यांचे शिक्के, तारीख, कागदाचे प्रयोजन पत्र कोणाला लिहिले ही माहिती असते. कागदावर छत्रपती किंवा प्रधान यांची सही नसते कारण त्या वेळी सहीची पध्दत नव्हती. त्या ऐवजी छत्रपति किंवा प्रधान यांच्या हस्ताक्षरात ''जाणीजे'' किंवा ''लेखनालंकार'' अशी अक्षरे आणि पत्राच्या शेवटी ''मर्यादेयं विराजते'' किंवा ''मोर्तबसुद'' असा शिक्का असतो. पत्राच्या सुरवातीला असलेले छत्रपति व प्रधान यांचे शिक्के आणि शेवटचा 'मर्यादेयं विराजते' किंवा 'मोर्तबसुद' या मधील मजकूर अधिकृत समजला जात असे. गाव किंवा गावे, जमिनी, वतने बहाल केलेल्या पत्रामध्ये चतु:सिमा, साक्षीदारांची नावे, त्यांच्या निशाण्या दाखविल्या जात असत. निशाण्या म्हणजे शेतकरी साक्षीदार असेल तर नांगराची निशाणी, सरदार असेल तर तलवारीची निशाणी. लग्न पत्रिकेवरच्या मजकूरावर जर लग्न सोहळा छत्रपती किंवा मोठ्या सरदाराच्या घरचा असेल तर छत्रपती किंवा सरदार यांच्या उजव्या हाताचा पंजा त्यावर उठविलेला असतो व त्या पत्रिकेवर केशर शिंपडलेले असते. अशा निमंत्रण पत्रिका आज पण पहाण्यास मिळतात. पंजा उठविण्यामागे हेतू म्हणजे हे प्रत्यक्ष आमंत्रण समजून कार्यास उपस्थित रहाणे हा होय. मुसलमानी राज्यकर्ते आपला सर्व व्यवहार उर्दू, फारशी भाषेत करीत असत व त्याखाली मोडी तर्जुमा असे. मराठी राज्यात मात्र सर्व लिखाण मोडीत असे.

ताम्रपटात बहुधा दानासंबंधी उल्लेख आढळतात. त्यामध्ये छत्रपतीने किंवा राजाने कोणाला, केव्हा कोणत्या कारणामुळे व काय दान दिले याचा निर्देश असे. यामुळे छत्रपती व राजा यांची नावे व त्यांचा काळ समजतो. गाव किंवा शेत जमीन दान दिली असेल चतु:सीमा साक्षीदार त्यांच्या निशाण्या हे नेहमी प्रमाणे असतेच.

शिलालेखावरुन तो कोणत्या राजाचा आहे, त्याचे नाव, काल, प्रयोजन हे सर्व कोरलेले असते. कल्याण शहराबाबत कान्हेरी लेण्यात शिलालेख आहेत त्यावरुन कल्याणचे प्राचीनत्व सिध्द झाले आहे.

जुन्या नाण्यांच्या आधारे ती कोणत्या राजाची आहेत, कोणत्या धातूची आहेत, त्यांचे वजन, आकार, काल हे सर्व समजते. नाण्यावर काल कोरलेला असतो. छत्रपति शिवाजी महाराजांनी दोन प्रकारची नाणी मराठी राज्यात प्रचारात आणली होती. एक 'शिवराई' व दुसरा त्यांचा प्रसिद्ध 'होन'. शिवराईवर एका बाजूवर ''श्री राजा

शिव'' व दुसऱ्या बाजूवर ''छत्रपती'' असे कोरलेले आहे. यांच्या आकारात व वजनात विविधता आढळते. होनाच्या एका बाजूवर ''श्री राजा शिव'' तर दुसऱ्या बाजूवर ''छत्रपति''. त्याचे वजन २-७२८ ग्रॅम व व्यास १-३२ सें. मि. होता. होन हे सोन्याचे तर शिवराई तांब्याची. असे म्हणतात की सध्या ५/६ होन उपलब्ध आहेत. ही सर्व नाणी महाराजांनी त्यांच्या राज्याभिषेकाचे वेळी व्यवहारात आणली.

बखरी हा एक वाङ्मयाचा प्रकार धरला गेला आहे. ह्यांच्या अस्सलपणाबद्दल मतभेद आढळतात. कारण ज्यांच्याबद्दल त्या लिहिल्या गेल्या त्या त्यांच्या मृत्यूनंतर लिहिल्या गेल्या. त्यांच्यात काही वेळा अतिशयोक्ती आढळते. परंतु सगळी बखर खोटी असू शकत नाही. आतापर्यंत शंभराच्या वर बखरी उपलब्ध झाल्या आहेत. त्यात काही ऐतिहासिक व काही पौराणिक आहेत. उदा. सभासद बखर, चिटणीशी बखर, ९६ कलमी बखर, पेशव्यांची बखर, माहीम उर्फ महिकावतीची बखर, पानिपतची बखर, बखरी सारखीच छत्रपति शिवाजी महाराज यांचे संबंधी प्रसिद्ध असलेली जेधे शकावली जेधे करीना महत्वाचे आहेत.

वरील सर्व विवेचनावरून इतिहास म्हणजे काय तो कसा तयार होतो किंवा लिहिला जातो आणि त्याच्या संशोधनासाठी कोणती साधने उपयोगी पडतात याचे थोडक्यात विवेचन केले आहे.

भाषणाचा शेवट करण्यापूर्वी एक विनंती करावीशी वाटते ती ही की, कल्याण हे फार जुने ऐतिहासिक शहर आहे आणि त्याबद्दल कान्हेरीच्या लेण्यात शिलालेख आढळतात. शिवाय आणखी जुना उल्लेख जैन वाङ्मयात आढळतो. या वाङ्मयात महाराष्ट्राच्या ज्या चतु:सीमा त्या काळी वर्णन केल्या होत्या त्यामध्ये कल्याणचा उल्लेख आहे. उल्लेख असा आहे - शिन्नर, जुन्नर, कल्याण, कांधार चार प्रदेश महाराष्ट्र. फडके, काळे, साने,जोशी, फडणीस, बोरगावकर मेघःशाम अशी जुनी घराणी येथे नांदत आहेत. त्यांच्याकडे जुनी कागदपत्रे असण्याचा दाट संभव आहे. येथे उपस्थित असलेल्या इतिहासप्रेमी जेष्ठ नागरिकांना माझी नम्र विनंती आहे की त्यांनी वरील घराण्यांशी संपर्क साधून कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न करावा तसेच कल्याण हे मुसलमानी अंमलात फार काळ असल्याने जुनी मुसलमानी घराणी येथे असण्याचा दाट संभव आहे. त्यांचेकडे पण जुनी कागदपत्रे असतील. या सर्वांकडून कागदपत्रे, ताम्रपट, नाणी मिळाल्यास कल्याणच्या आणि मराठ्यांच्या इतिहासात भर पडून अज्ञात माहिती उजेडात येईल. ही कागदपत्रे कोणत्याही भाषेत लिपीत असो, त्यांचे बालबोधीकरण करून देण्यात येईल. कागद इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असतील तर शासनाकडे दिल्यास त्याबद्दल योग्य तो मोबदला मिळतो. इतिहासाचे हे जे पुरावे आहेत त्यांचे जतन करणे शक्य आहे.

**श्री. र. पुरोहित**

(टीप : पुरोहित स्वतः पुराभिलेख खात्यात संचालक म्हणून निवृत्त झाले होते. वरील भाषण त्यांनी कोठे व कोणत्या निमित्ताने केले त्याचा तपशील नाही. परंतु या भाषणात भाऊसाहेबांची बखर, श्रीसमर्थांची बखर, बकासुराची बखर, नलाखानाची बखर, पांडवांची बखर, अर्जुनाची बखर, कर्ण राजाची बखर, द्रौपदी वस्त्रहरणाची बखर, सांप्रदायिक बखरी (३) -गुरु चरित्रावर दामाजीची बखर, जयरामस्वामी, मिशनरी चळवळी वर अशी यादी एका पानावर केली आहे. - संपादक)

# ''कलानुरुप बुनियादी शिक्षण''

बुनियादी शिक्षणाची संकल्पना प्रत्यक्षात आली व कालानुरुप तिच्याकडे पहावयाची दृष्टी विकसित झाली तर समाजाची प्रगती अधिक योग्य तऱ्हेने होईल या विचारांच्या कक्षा स्पष्ट करणारा हा लेख. - संपादक

विद्येचा अर्थ आहे - लोकोपयोगी पडणारे सर्व प्रकारचे ज्ञान. मुलांचे शरीर, बुध्दी, हृदय यांचा समतोल विकास झाल्यास त्यांचा शारिरीक, मानसिक व आध्यात्मिक विकास शक्य होईल. शिक्षण हे केवळ उदरनिर्वाहापुरते सीमित राहिले आहे. ते बहुतांशी स्पर्धात्मक स्वरुपाचे शिक्षण झाले आहे. स्वतःच्या ऐहिक सुखांच्या कल्पनांची पूर्तता करणाऱ्या विद्याशाखेची आजचा विद्यार्थी प्राधान्याने निवड करतो. तरी देखील आजच्या शाळा व विद्यापीठे मुलांनी वयाच्या २० ते २२ व्या वर्षापर्यंत शिक्षण घेतले तरी विद्यार्थ्याला समाजाच्या सेवेचे क्षेत्रही पुरवीत नाहीत किंवा त्याचा उदरनिर्वाह होईल याची खात्रीही देत नाहीत.

या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीजीच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास केला पाहिजे. गांधीजींनी सुचविलेले बुनियादी शिक्षण हे त्या गावातील मूळ उद्योगावर आधारित असते. गावातील उद्योग शास्त्रीय दृष्टीकोनातून मुलांना शिकविता - शिकविता त्या अनुषंगाने गणित, भूगोल, इतिहास, शास्त्र यांचे ज्ञान मुलांना देणे व त्यांच्या भाषेचा विकास करणे महात्मा गांधींना बुनियादी शिक्षणांर्तगत अपेक्षित होते. याचाच अर्थ असा की, शिक्षणाने विद्यार्थ्याला स्वावलंबी बनविले पाहिजेच. शिवाय शैक्षणिक संस्थेला शिक्षणावर करावा लागणारा खर्चही त्या शिक्षणामधून मिळाला पाहिजे-असे 'शिक्षण स्वावलंबन' गांधीजींना बुनियादी शिक्षण संकल्पनेमध्ये अभिप्रेत होते. प्राथमिक स्तरावरील शिक्षण - म्हणजेच, सध्या शालांत परीक्षेपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर आता पुढे काय करावे? असा प्रश्न विद्यार्थ्याला पडता कामा नये. त्या दृष्टीने गावांमधील शाळांतून बागकाम, शेती, वस्त्रोद्योग, सुतारकाम, विणकाम इत्यादी व्यवसायांचे शास्त्रशुद्ध शिक्षण मुलांना देता येऊ शकते, ही बाब बुनियादी शिक्षण विचारात घेते. म्हणजेच, उपजीविकेसाठी साहाय्यभूत ठरणारी ही कौशल्ये संपूर्णतः एतद्देशीय असून ती विद्यार्थ्याला स्वावलंबी बनवितात. तसेच कुटुंबापासून-गावापासून त्याची नाळ तोडत नाहीत.

याच प्रकारे शहरी शिक्षणामध्ये बुनियादी शिक्षणाचा वापर होऊ शकतो का ? याचा विचार करण्यासाठी खालील मुद्दे प्रथमतः लक्षात घेतले पाहिजेत :

१) शहरातील उद्योग

२) त्या उद्योगांवर आधारित शिक्षणक्रम

**१) शहरातील उद्योग** - बर्तमानपत्रे, दूरदर्शन, आकशवाणी इत्यादी सारखी प्रसारमाध्यमे, वीज, पाणी, रस्ते इत्यादी सेवा पुरविणारी सेवा, केंद्रे, कारखाने, लघु उद्योग, यंत्रसामग्रीची परिक्षण व दुरुस्त्या, संगणक, अंतराळ संशोधन यांसारखी क्षेत्रे अशी विविध सेवा केंद्रे व व्यवसाय शहरांमध्ये उपलब्ध असतात. शहरांमधील शाळांतून शालांत परीक्षेपर्यंतचे शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्याला अशा प्रकारच्या सेवा केंद्र अथवा व्यवसायामध्ये काम करुन आपला उदरनिर्वाह साधण्यासाठी बुनियादी शिक्षणाची गरज आहे व त्या अनुषंगाने, सध्याचा शिक्षणक्रम बदलला पाहिजे, असे वाटते.

२) शहरांतील उद्योगांवर आधारित शिक्षणक्रम- शहरातील विविध उद्योग विचारात घेऊन सध्याच्या शालांत परीक्षेपर्यंतच्या (म्हणजेच प्राथमिक+ माध्यमिक शिक्षण) शिक्षणाचा दर्जा सध्या विद्यापीठीय स्तरावर देण्यात येणाऱ्या शिक्षणाला पूरक ठरेल एवढा उंचावला पाहिजे. सध्याचे विद्यापीठीय शिक्षण हे निव्वळ पुस्तकी आहे. सध्याच्या विद्यापीठीय स्तरावरील पदवीपर्यंतच्या शिक्षणामध्ये काही एक प्रमाणामध्ये पदव्युत्तर शिक्षणाचा अंतर्भाव करुन विद्यापीठीय स्तरावर ज्ञान, अनुभव व संशोधन या बाबींनाही प्राधान्य दिले पाहिजे.

वास्तव, प्राथमिक शिक्षणामध्ये तंत्र शिक्षणाचा अंतर्भाव करणे योग्य होईल. (या लेखात प्राथमिक शिक्षण म्हणजे वयाच्या १४ वर्षापर्यंतचे शिक्षण अथवा सध्याच्या शालांत परीक्षेपर्यंतचे शिक्षण असा अर्थ गृहीत धरला आहे.) सध्या तंत्र शिक्षण पुरविण्यासाठी आय.टी.आय. सारख्या संस्थांची सुविधा शासनाने केली आहे. तथापि, या संस्थांमध्ये शालांत परीक्षेनंतर प्रवेश मिळतो व मर्यादित विद्यार्थीच या सुविधेचा लाभ घेतात. तेव्हा शाळेमध्येच विविध प्रकारच्या वाहनांच्या, यंत्रांच्या प्रतिकृती मुलांना हाताळायला दिल्या पाहिजेत. यांत्रिक क्रिया मुलांना शिकविली गेली पाहिजे. विविध यंत्रे कशाप्रकारे कार्यरत होतात याचे अनुभवांद्वारे मूलभूत असे ज्ञान देताना गणित, भौतिकशास्त्र हे विषय शिकविता येतील. इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रीकल तंत्रज्ञान या शाखांचेही ज्ञान मूलभूत स्वरुपात मुलांना प्राप्त करता येईल. तसेच त्याद्वारे उदरनिर्वाहाचे साधन व कौशल्यही विद्यार्थ्याला उपलब्ध होऊ शकेल. त्याद्वारे 'शिक्षण स्वावलंबन' ही साध्य होईल.

यंत्रे, संगणक, खगोल शास्त्राबद्दल मुलांना माहिती देताना मानवाच्या प्रगतीच्या टप्प्यांचीही म्हणजेच अश्मयुग, ताम्रयुग, मध्ययुग, औद्योगिक क्रांती, दुसऱ्या महायुध्दानंतरचे बदललेले जग, संगणकीकरण आणि माहिती व तंत्रज्ञानाचे सध्याचे युग यांची व त्यांच्यामधील परस्परसंबंधाची माहिती देत इतिहास व भूगोल हे विषय मुलांना शिकविता येतील.

मोठमोठ्या कारखान्यांना लागणारा कच्चा माल पुरविणाऱ्या लघु उद्योगांची ओळख करुन देत रसायनशास्त्र शिकविता येईल. ॲलोपॅथी, होमिओपॅथी, आयुर्वेद वगैरेंना लागणाऱ्या वेगवेगळ्या औषधांसाठीचा कच्चा माल पुरविणे यांसारखे उद्योगही विचारात घेणे योग्य ठरेल.

या तांत्रिक बाबींबरोबरच कारखाने किंवा सेवा केंद्रांचे व्यवस्थापन (organization & management ) कसे करावे याचे प्रशिक्षण द्यावे. वित्त व्यवस्थापन, विक्रीचे तंत्र, संवाद कौशल्ये ही शिकविली पाहिजेत.

आज जागतिकीकरणामुळे सर्व जग जवळ आले आहे. त्यामुळे इंग्रजीबरोबर आणखी एखाद्या परकीय भाषेची ओळख आवश्यक ठरत आहे. परिणामी, स्थूलमानाने विद्यापीठीय स्तरावरील शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्व संबंधित काळाला अनुरुप असे घडलेले असेल.

येथे आणखी एक बाब लक्षात घेतली पाहिजे. ग्रामीण भागामध्ये रोजी-रोटीचा प्रश्न जेवढ्या तीव्रतेने जाणवतो; तेवढा तो शहरांमध्ये जाणवत नाही. त्यामुळे शहरांमध्ये विविध कलाशिक्षणालाही महत्त्व दिले जाते. मुलांमधील सुप्त गुणांचा विकास करुन गायन, नृत्य, चित्रकला, वाचन, लेखन वक्तृत्व, सादरीकरण इत्यादी अंगभूत कौशल्यांना वाव दिला पाहिजे. त्याद्वारे देखील उपजीविका करणे शक्य झाले पाहिजे.

अर्थातच या विषयांची ओळख करुन देण्याचे प्रमाण हे विद्यार्थ्याचे वय लक्षात घेऊन ठरविले पाहिजे. विद्यार्थ्याला प्राथमिक स्तरावर अशा प्रकारचे शिक्षण दिल्यानंतर तो लघु उद्योग किंवा दुरुस्त्यांसारख्या सेवा

पुरविण्यास सक्षम बनू शकेल. मात्र, या विषयांची प्राथमिक शाळेमध्ये ओळख झाल्यावर विद्यार्थ्याला त्याची आवड व त्या विशिष्ट विषयातील त्याची बौध्दिक क्षमता लक्षात घेऊन विद्यापीठीय स्तरावर त्याची सखोल आवड व त्या विशिष्ट विषयातील त्याची बैध्दिक क्षमता लक्षात घेऊन विद्यापीठीय स्तरावर त्याचे सखोल ज्ञान प्राप्त करण्याचे स्वातंत्र्य हवे. म्हणजेच, इतर विषयांची नावड व त्या अनुषंगाने त्यामध्ये त्याला मिळणारे कमी गुण यांची त्याला त्या विशिष्ट विषयांची नावड व त्या अनुषंगाने त्यामध्ये त्याला मिळणारे कमी गुण यांची त्याला त्या विशिष्ट विषयामध्ये पारंगत होण्यास अडचण होता कामा नये. बुनियादी शिक्षणाचा शहरी शिक्षणामध्ये उपयोग केल्यास फक्त प्राथमिक स्तरावरील शिक्षण (शालांत परीक्षा) झाल्यावर विद्यार्थ्याला समाजाची सेवा व त्या बरोबरच स्वत:चा उदनिर्वाह करता येईल व विद्यापीठीय शिक्षण हे अगदी निकडीचे राहणार नाही. आज विद्यापीठीय शिक्षण हे आत्यंतिक गरजेचे मानले जात असून आपल्या मुलांची किमान अर्हता तेवढी असलीच पाहिजे ही आजच्या समाजाची मानसिकता बदलून एखाद्या विषयात निष्णात होण्याची ओढ / तळमळ ज्याला आहे व खरोखरीच तेवढी क्षमता ज्याच्यामध्ये आहे असेच विद्यार्थी विद्यापीठीय शिक्षणाकडे वळतील. त्यामुळे आज युवाशक्तीची शिक्षण प्राप्त करण्यामध्ये खर्च होत असलेली वर्षे वाचतील व शासनाचा व पर्यायाने समाजाचा विद्यापीठीय शिक्षणावर होणारा अवास्तव खर्चही वाचेल. उलटपक्षी, तोच निधी वापरुन विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा उंचावता येईल. अर्थातच, याची सुरुवात आता देखील संबंधित शाळा आपल्या शाळेतील समाजसेवा व कार्यानुभावासाठीच्या तासिकांचा वापर करुन करु शकतात. अशाप्रकारे बुनियादी शिक्षणाचा विविध स्तरांवर अंतर्भाव केल्यास ग्रामीण व शहरी विभागांसाठीची शिक्षणपध्दती लवचिक व परिवर्तनीय राहील व येणाऱ्या २०-२५ वर्षानंतरच्या काळातील गरजा ओळखून मुलांना शिक्षण दिले जाईल तरच आपली मुले या जगात टिकाव धरु शकतील.

वास्तविकत: स्वातंत्र्योत्तर काळात महात्मा गांधीजींनी मांडलेल्या बुनियादी शिक्षणावरील विचारांच्या आधारे ब्रिटीश शिक्षण व्यवस्थेमध्ये बदल करणे अपेक्षित होते. त्या उलट आपण गांधीजींच्या 'खेड्यांकडे चला' या संदेशाकडे दुर्लक्ष केले. व्यक्ती व समाजाच्या विकासावर केंद्रीत असलेल्याला बुनियादी शिक्षणावर चांभारकाम, सुतारकाम, बागकाम विणकामाचे शिक्षण अशी टीका केली गेली. शिक्षण स्वावलंबनाच्या कल्पनेवर मुलाना राबवून शैक्षणिक संस्था त्यांचा शिक्षणावरील खर्च वसूल करतील अशीही टीका झाली. गांधीजींचा यंत्राना विरोध आहे. असाही गैरसमज आहे. खरे तर, गांधीजी यंत्रविरोधीही नव्हते. यंत्रांचा वापर एतद्देशीय व्यवसायांचा विकास होण्यासाठी आवश्यक आहेच. आजच्या औद्योगिक धोरणामध्ये स्थानिक व्यवसाय दुर्लक्षित राहिल्यानेच आज मुंबईला परप्रांतीयांच्या लाढ्यांचा प्रश्न भेडसावत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण व शहरी विभागासाठी शिक्षणाचा स्थूलमानाने सारखाच आराखडा बनवून स्थानिक गरजांनुसार वेगवेगळा अभ्यासक्रम तयार व्हायला हवा होता. म्हणजेच, देशातील विद्यार्थ्यांची विकसित करावयाची किमान कौशल्ये एक ठेवून त्यांच्या स्थानिक परिसरानुसार त्यांना अनुभव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास केला असता तर आज खेडी ओस पडून शहरांवर अतिरिक्त ताण पडला नसता. तसेच आज ग्रामीण जीवन म्हणजे शरीर श्रमावर आधारीत जीवन आणि शहरी जीवन म्हणजे बौद्धिक क्षमतेवर आधारित जीवन असा भेदही झाला नसता.

प्राथमिक शिक्षणासंदर्भातील 'पब्लिक रिपोर्ट ऑन बेसिक एज्युकेशन इन इंडिया' (पी.आर.ओ.बी.इ) - 'प्रोब' च्या अहवालाने असे दाखवून दिले आहे की, ९८% पालकांची मुलांनी शिक्षण घ्यावे ही इच्छा असूनही

समाजातील बऱ्याच मोठ्या गटातील मुले शिक्षणापासून वंचित आहेत. सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये घरकाम, शेतीकाम वगैरे काम करुन मुलांजवळ उपलब्ध असणाऱ्या मोकळ्या वेळेचा उपयोग करत त्यांची शाळा भरत नाही. तसेच सध्याचे शिक्षण या वंचित गटांच्या आर्थिक व सामाजिक बाजूही विचारात घेत नाही. सध्याचे शिक्षण मूल शिकत असताना त्या घराचा रोजी-रोटीचा प्रश्न सोडवीत नाहीत. त्याला शहरात जाऊन नोकरी करायची असते. त्याउलट जीवनभिमुख असलेले बुनियादी शिक्षण हे 'शिक्षण स्वावलंबना'चे तत्त्व अंगीकारत असल्याने मुलांना त्यांच्या आई-वडिलांच्या व्यवसायाची पर्यायाने त्यांच्या जीवनाचीही ओळख करुन देते.

यास्तव, बुनियादी शिक्षणाबद्दलचे गैरसमज दूर करुन बुनियादी शिक्षणाचा ग्रामीण व शहरी भागांमध्ये विविध स्तरांवर अंतर्भाव करुन आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याची गरज आहे. त्यासाठी दीर्घ कालावधी लागेल, हे तर खरेच. परंतु, अशा प्रकारचा बदल घडवून आणण्याकरिता प्रबळ राजकीय इच्छाशक्तीबरोबरच समाजाच्या मानसिकतेमध्ये बदल घडवून आणण्याची व घडण्याची नितांत गरज आहे.

**अमृता कुलकर्णी**

अभ्यासगट सदस्य - ठाणे जिल्हा शाखा

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद

प्लॉट नं. १७, केदार सोसायटी,

समर्थ नगर, शिरगाव, बदलापूर (पूर्व)

भ्रमण दूरध्वनी क्र. ९८३३०२६३६४

•••

## श्रद्धांजली



कै. द. या. खर्डे

विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणीचे माजी सभासद श्री. द.या. खर्डे यांचे शनिवार दि. ११-२-२००६ रोजी रात्री ९-०० वाजता वयाच्या ८९ व्या वर्षी वार्धक्यामुळे दुःखद निधन झाले. कै. खर्डे १९६० पासून २००४ पर्यंत, कार्यकारिणीचे सभासद होते. मंडळाच्या शाळा व महाविद्यालयांच्या सर्व सभांना हजर रहात व सर्व विषयात मनापासून रस घेऊन चर्चेत भाग घेत असत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हिच प्रार्थना.

दिशा
नियमित वाचा

# विशिष्ट कृषि योजना
# कृषि चिकित्सालय तथा शेतकरी प्रशिक्षण केंद्र

*कृषि चिकित्सालये ही शासनाची योजना दूरदर्शी असून कृषि उत्पादन वाढीच्या दृष्टीने या चिकित्सालयांचा भविष्यात उपयोग होणार. - संपादक*

राज्य शासनाच्या नवीन कृषिविषयक धोरणामध्ये तसेच डॉ. स्वामीनाथन समितिच्या प्रमुख शिफारशींवर शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात आले आहे. कृषि तंत्रज्ञानाच्या प्रभावी, परिणामकारक आणि जलद गतीने प्रसारावर आणि ते शेतकऱ्यांनी आत्मसात करण्यावर दर्जात्मक कृषि वाढीचा उत्पादन वेग अवलंबून असतो. हा दृष्टिकोन आधुनिक कृषि तंत्रज्ञान राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत शेतकरी प्रशिक्षण आणि प्रात्याक्षिकाचे माध्यमातून प्रभावीपणे आणि जलदगतीने पोहचविणे ही शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाची गरज विचारात घेऊन राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये कृषि चिकित्सालय स्थापन करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

स्थापित कृषि चिकित्सालयांवरती एक किंवा दोन दिवसांचे शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत असून त्याठिकाणी विविध प्रकारच्या योजनांची माहिती प्रात्याक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यात प्रामुख्याने प्रशिक्षणाला येणाऱ्या शेतकऱ्यांना प्रक्षेत्रावरील प्रात्यक्षिकांना भेटी देऊन व त्यांचे कृषि तंत्रज्ञान विषयक समस्यांचे निराकरण करुन त्यांना अद्ययावत कृषि तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

विस्तार कार्यामध्ये प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून तालुका बीजगुणन केंद्र, अन्वेक्षा-नि-प्रात्यक्षिक केंद्र, तालुका फळरोपवाटिका येथे उपलब्ध असलेल्या जमिनीवर प्रक्षेत्राचा वापर केवळ रोपे/बीजगुणन यांच्यापुरता मर्यादित न ठेवता या प्रक्षेत्राचा वापर विविध प्रात्यक्षिक घेण्यासाठी करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी कृषी चिकित्सालये अस्तित्वात आहेत, त्या ठिकाणी त्या भागातील पिके विचारात घेऊन सुधारित तंत्रज्ञानाबाबतची प्रात्यक्षिक आयोजित करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांची गरज, त्या भागातील प्रमुख पिके आणि त्या भागासाठी प्रसारित करावयाचे, आधुनिक तंत्रज्ञान नव्याने अवलंबवायचे तंत्रज्ञान इत्यादींचा विचार करुन प्रत्येक हंगामात घ्यावयाच्या प्रात्याक्षिकांचा कार्यक्रम हंगामापूर्वीच शेतकऱ्यांना प्रशिक्षणामध्ये प्रात्याक्षिकांच्या सहाय्याने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

कृषि चिकित्सालयावर आधुनिक तंत्रज्ञानामार्फत त्या त्या भागात विविध जाती लागवडीच्या विविध पद्धती तसेच त्या भागात उपयोगी ठरु शकणारी नवीन पिके आणि त्यांच्या विविध जाती. चारा पिके, औषधी वनस्पती यांच्या प्रभावी प्रसारणासाठी पीक संग्रहालय तयार करण्यात आलेले असून या संग्रहालयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध जातीच्या पिकांचे प्रशिक्षण आणि प्रात्याक्षिके उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त निळे हिरवे शेवाळ, भाजीपाला बियाणे, नवीन पिकांच्या वाणाचे बियाणे, कलमे/रोपे ठरलेल्या किंमतीत उत्पादन इत्यादी अल्प प्रमाणात तसेच छोट्या पॅकमध्ये शेतकऱ्यांना हवे असल्यास विक्री करण्याच्या सुविधा टप्पाटप्प्याने कार्यान्वित होत आहेत.

कृषि चिकित्सालयांवर शेतकऱ्यांना प्रशिक्षित करणे, प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाची

ओळख करुन देणे, मृद आणि जल पृथ्थकरण, कीड आणि रोग निदान इत्यादींचे माध्यमातून उत्कृष्ट प्रकारची सेवा उपलब्ध करुन देणे, ठिबक आणि तुषार संचाचा वापर आणि त्याद्वारे जलव्यवस्थापन इत्यादींबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सल्ला देऊन साहाय्य करणे इत्यादी सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

राज्यामध्ये सन १९९७-९८ पासून ही योजना कार्यान्वित झाली असुन सन २००२-२००३ अखेर एकूण १४८ कृषी चिकित्सालये विशेष अनुदान उपलब्ध करुन कार्यान्वित करण्यात आली आहेत. सदरची कृषि चिकित्सालये कार्यान्वित करण्यासाठी राज्य योजनेशिवाय, आदिवासी उप योजना, विदर्भ वैज्ञानिक विकास मंडळ, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आणि मराठवाडा वैज्ञानिक विकास मंडळ यांनी अनुदान उपलब्ध करुन देऊन आर्थिक सहयोग दिला आहे.

कृषि चिकित्सालयाअंतर्गत मुख्यत: तीन प्रकारचे विस्तार कार्य हाती घेण्यात आले असून त्यामध्ये १) शेतकरी प्रशिक्षण २) प्रात्यक्षिकांचे आयोजन ३) शेतकऱ्यांना कृषिसल्ला आणि काही निदान विषयक सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे कृषि सेवा यामध्ये कृषि बहुविध चिकित्सालये स्थापन करीत असताना शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके आणि मेळावे या व्यतिरिक्त शेतकऱ्यांना अल्प प्रमाणात तांत्रिक सेवा सुद्धा उपलब्ध करुन देण्याचा महत्त्वाचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये गांडूळ शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी गांडूळ कल्चर, गांडूळ खत उत्पादन आणि विक्री, तसेच निळे-हिरवे शेवाळ उत्पादन आणि विक्री तसेच नाडेप संखाद उत्पादन याबाबतही मार्गदर्शन करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त पिकांची रोगहानी, किडोंची ओळख आणि निदान व त्यावर उपाययोजना याबाबत सुद्धा चिकित्सालयावरती मार्गदर्शन करण्यात येते. आवश्यक वाटल्यास मृद नमुना, सखल मृद तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येण्याच्या सुविधासुद्धा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

या व्यतिरिक्त विविध तंत्रज्ञानाची पुस्तके वाचनालयाच्या स्वरुपात चिकित्सालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत असून चिकित्सालयावर नवीन तंत्रज्ञानावर आधारित मॉडेल आणि सुधारीत अवजारे ठेवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सुविधासुद्धा उपलब्ध आहेत. उच्च तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम (शीतगृह, हरितगृह) सुद्धा चिकित्सालयावरती उपलब्ध करुन देण्यात आलेले असुन त्याबाबत घ्यावयाच्या फळपीकांची व फुलांची यथोचित माहिती व मार्गदर्शन चिकित्सालयावर करण्यात येत आहे. हंगामामध्ये येत असलेल्या विविध रोग आणि किडींचा उपद्रव कसा होतो व या नमुन्याची वेळीच पाहणी करणे आवश्यक असल्याने रोगग्रस्त नमुने गोळा करुन त्याची माहिती व उपाययोजना संग्रहालयात ठेवून तसेच त्याची तपासणी करुन त्याच्यावर उपाययोजना करण्याचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना वेळीच करुन देण्याबाबतचे सुविधा देखील उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

राज्यामध्ये स्थापित झालेल्या चिकित्सालयांवर शेतकऱ्यांना प्रशिक्षण वर्गास सहभागी व्हावयाचे असेल तर त्यांनी आपल्या जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी तसेच तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्याचा लाभ घ्यावा.

**ईश्वर देविदास थिटे**
माजी विद्यार्थी
वृत्तपत्र विद्या व पत्र
संज्ञापन पदविका,
बांदोडकर महाविद्यालय, ठाणे

चित्रपालवी

# मुलांनी चित्रं काढायलाच हवीत

*'प्रौढ लोक लहान मुलांना शिकवू शकत नाहीत. उलट लहानं मुलांकडून बरेच काही शिकता येईल' असे म्हणणाऱ्या पाब्लो पिकासोला बाल चित्रकलेचं महत्त्व माहीत होत. या महत्वाबाबत चित्रपालवीतील हा पुढचा लेख. - संपादक*

बालकलेचं महत्त्व यात समर्थपणे स्पष्ट होतं. प्रत्येक विद्यार्थ्याला एक संस्कारक्षम, प्रतिक्रिया व्यक्त करणारं मन असतं. याची प्रचिती चित्रकलेच्या माध्यामातून येऊ शकते. 'शिक्षण हे मानसशास्त्राला अनुसरुन दिलं पाहिजे' असं म्हटलं जातं. पण बालचित्रकलेचा जेव्हा संबंध येतो तेव्हा ही भूमिका कोठे जाते? मुलांच्या जडणघडणीत बालचित्रकला ही फार मोलाची भर घालते एखादी वस्तू जशी असते तशी काढण्यापेक्षा जशी वाटते तशी काढण्यावर त्यांचा भर असतो.



प्रत्येक बालक निरागस असते म्हणून आणि त्या अर्थानं प्रत्येक बालक हे कलावंत असते. काही बाल कलावंत असतात आणि काही अकलावंत असतात असे वर्गीकरण योग्य नाही. शैशवास्थेत चांगली चित्रं काढणारी मुलं पुढे कलावंत होतील असं नाही व ती अपेक्षाही नाही. पण या मुलांचा कल पाहून ती कोणात्या क्षेत्राकडे जावीत याबाबतची लक्षणे मुलांच्या चित्रात स्पष्टपणे दिसतात. अशी चांगली चित्रे रंगविणाऱ्या मुलांना मुद्दाम चित्रकलेचे धडे देऊन त्यांचे बाल्य हिरावून घेऊ नये. त्यांचे निरागस शैशव जपायला हवं. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' हे केशवसुतांचं वचन सर्वच कलावंतांना लागू पडते.

प्रौढांच्या कलाविषयक कल्पना त्यांच्यावर न लादता त्यांना मुक्तपणे चित्रं काढू दिली तर त्यांच्या चित्रात त्यांचं अंतरंग सहजपणे चित्रात उमटलेलं दिसतं. त्याच्यातील सहज प्रवृत्ती अगदी ठळकपणे दिसतात. त्यांचा व्यक्ती विकासाच्या दृष्टीने फार उपयोग होतो ते शालेय शिक्षकांसोबतच घरी पालकांनीही करुन घ्यायचा असतो. मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी त्याच्यातील चांगल्या गुणांना खतपाणी घातला येतं. पण त्यांना मुक्तपणे चित्राविष्कार करु दिला नाही तर सगळ्या शक्यता फोल ठरतात.

पाश्चिमात्य देशात या दिशेने अगदी पद्धतशीर उपक्रम राबवले जातात. त्याचं महत्त्व आपल्याकडे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांना अजून उमगले नाही. मानसशास्त्राचा त्या दृष्टीनं कसून अभ्यास होत नाही.

आजच्या कला शिक्षकांना बालकलेचं महत्त्व व त्याची पथ्यं माहीत असतात. पण शाळेतील मुख्याध्यापक व इतर वरिष्ठांच्या अज्ञानापुढे ते हतबल ठरतात. शिक्षक म्हणून आपले कार्य करण्यास त्यांना पुरेसं स्वातंत्र्य मिळत नाही. शिक्षकानं चित्र फळ्यावर काढावं व त्याप्रमाणे मुलांनी काढावं अशी अपेक्षा आजही केली जाते. तपासणीसाठी आलेले अनभिज्ञ शिक्षणतज्ज्ञ, कलाशिक्षकानं फळ्यावर चित्र काढलं नसेल तर 'काम नीट नाही' असा शेरा मारतात.

मुलांना छापील पुस्तके घेण्याची सक्ती संचालक, मुख्याध्यापक करतात ते चुकीचं आहे. त्यातून मिळणाऱ्या फायद्यापेक्षा मुलांच्या मुक्त विष्कारातून मिळणारा आनंद खूप मोलाचा आहे. कारण या पुस्तकातून ठिपके जोडून चित्र तयार करा व रंगवा किंवा चित्रावर नुसतं पाणी लावून चित्र रंगीत करा अशी आयती चित्रं पाहायला मिळतात. हे प्रकार बालमानाच्या वाढीस घातक आहेत. अनुकरणाची सवय लावल्यावर ही मुलं स्वतंत्र शैलीत काम करणार नाहीत व ती नुसती नकलाकार बनतील.

मुलांच्या सहज प्रवृत्तींच उन्नयन करणारी म्हणून कलेकडे पाहिले जाते. उदा. कागद फाडणं ही सहज प्रवृत्ती. पण या फाडलेल्या कागदातूनही कलाकृती तयार करता येते. यासारखे उपाय उपकारक ठरतील. मोडतोड करणाऱ्या मुलांना त्या मोडतोडीतून परत जोडलं जातं हे दाखवल्यास उत्तम होईल. मुलांमधील क्रियाशीलतेला वळण द्यायचं तर त्यासाठी अनिर्बंध क्षेत्र हवं. त्या दृष्टीने भिंत उत्तम. भिंत म्हणजे मुलाच्या मनाचा आरसा. त्यावर मुक्तपणे चित्र काढणं मुलांना आवडतं. पण आज तथाकथित उच्चभ्रू लोक मुलांना भिंताला हात लावू देत नाहीत. खरं तर मोठा कागद भिंतीवर लावून दिला तर भिंतही खराब होणार नाही व मुलांना भिंतीवर चित्र काढल्याचं समाधन मिळेल. पालकांनी यांत्रिक खेळण्यांवर खर्च करण्यापेक्षा मुलांच्या रंगसाधनांवर जास्त खर्च केला तर ते उचित ठरेल. कारण निरीक्षण केल्यास असे लक्षात येईल की, मूल जेवढं भिंतीवर किंवा तत्सम पृष्ठभागावर रेघोट्या मारण्यात रमत तेवढं खेळण्यांमध्ये रमेलच असं नाही. मुलांच हे चित्र काढण्यात रमणं म्हणजे एकाग्रतेची सुरुवात हीच एकाग्रता पुढे अभ्यासातही उपयोगी येते पण मुलांच्या या एकाग्रतेवर चित्र काढण्याच्या हक्कावरच गदा येते. मुलांच्या चित्रांना कलेत महत्त्व आहे हे यातील निरागसतेच्या आविष्कारामुळे. त्यांच्या चित्रात शिस्तबद्ध रचना-कौशल्य दिसत नाही. पण भावनेचा सहज सुंदर भाबडा आविष्कार पाहावयास मिळतो. त्यांची निरीक्षण क्षमता कळते. एक प्रसंग येथे नमूद करावयासा वाटतो. आमच्या शेजारच्या ३ वर्षाच्या मुलानं एक चित्र काढलं व मला विचारलं हे काय आहे ? चित्र पाहून म्हटलं, 'दिवा असेल. 'तरीही चूकच. तू हरलीस. हा पंखा आहे. गोल गोल फिरल्यावर अशा रेषा दिसतात. बंद झाला की तीनच रेषा दिसतात.'

अशा अनुभवांकडे पालकांनी डोळसपणे पाहायला हवं. मुलांशी त्यांनी काढलेल्या चित्रांबद्दल संवाद साधायला हवा. त्यांना मोकळेपणा द्यायला हवा. नाहीतर त्यांची प्रतिभा आतल्याआतच कोमेजून जाईल व कदाचित ती विघातक मार्गाला लागतील.

**मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग,
घंटाळी, नौपाडा,
ठाणे- ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१४५३९

□□□

**जोशी बेडेकर महाविद्यालय**
पुढील परिषद
**बायोएथिक्स**
अर्थात
**जैवनीती**
या विषयावर

श्री राम जयराम जय जयराम

# नामस्मरण

*फेब्रुवारी -मार्च महिन्यात संत स्मृतींचे महत्त्व आहे. रामदास स्वामी, तुकाराम महाराज, एकनाथ महाराज इ. संतांच्या आठवणींचे हे दिवस. या सर्व संतांनी 'नाम स्मरणाचे' महत्त्व सांगितले आहे. या नाम स्मरणाबाबत. - संपादक*

हरी भक्ती करुन स्वतःचा व पूर्वजांचा उद्धार यातच नरजन्माची सफलता आहे. ती भक्ती नवविधा आहे.

श्रवण कीर्तन विष्णोत स्मरणं पादसेवनम ।
अर्चनं बदल दास्यं सख्यमात्मे निवेदनम् ॥

श्री समर्थ रामदासांनी श्री दासबोधाच्या चवथ्या दशकात या नवविधाभक्तीचे वर्णन साकल्येकरुन केले आहे. पहिली भक्ती जी श्रवणभक्ती यामध्ये आधुनिक जे जे शास्त्रीय शोध लागत आहेत ते ते सर्व ऐकून व जाणून घेऊन त्यात जे सार असेल तेवढ्याचा संग्रह करावा. कीर्तन भक्तीमध्ये परमेश्वराच्या कीर्तनात कीर्तनकार व श्रोते तल्लीन होऊन एकरुप होतात. तिसरी भक्ती म्हणजे नामस्मरण होय. नामस्मरण अखंड घडावे. आपल्या प्रांपचिक सुखदुःखामुळेही त्यात खंड पडता कामा नये. चौथ्या पादसेवन भक्तीमध्ये मूर्तीचे पादसेवन करता येत नाही म्हणून सद्‌गुरुचेच पादसेवन करावे. अर्चन भक्तीमध्ये आपल्या देवतांचे पूजन तर करावेच परंतु त्याच बरोबर लोकोपयोगी कामे धमार्थ करावी. सहाव्या वंदनभक्तीमध्ये कोणाच्याही ठिकाणी एखादा गुण उत्कटरीतीने असला तर ते सद्‌गुरुचे अधिष्ठान आहे असे जाणून त्यास वंदन करावे. सातव्या दासभक्तीत देवाच्या द्वारी देवाची सेवा करावी, त्याचप्रमाणे जीर्ण देवालयांचा उद्धार करणे. धर्मशाळा बांधणे वगैरे कामे करावी. सख्य भक्तीमध्ये देवाच्या मनासारखे आपले वर्तन राहिले म्हणजे सहजच आपले देवाशी सख्य घडते. नवविधा भक्तीमधील आत्मनिवेदन भक्ती ही सर्वात श्रेष्ठ आहे. याचे कारण जोवर ही भक्ती घडली नाही तोपर्यंत जन्ममरण चुकत नाही. अशा या नवविधा भक्तीमध्ये कीर्तनाईतकेच नामस्मरण भक्तीला सर्व संतानी गौरविले आहे. परमेश्वराचे नाम कंठी धारण करून कळीकाळावर मात करता येते. हृदयात परमेश्वराचे सतत स्थान असावे व हे नामस्मरणानेच साध्य होते, असे सर्व संताना वाटते.



।एक तत्वमाम दृढ धरी मना ।
॥ सकळ धर्माचे कारण ।
नामस्मरण हरी कीर्तन ॥
॥ समुद्र वलयांकित पृथ्वीचे दान।
करिता समान नवे नामा॥
तत् आणिक करिसी अही।
नावावरते साधन नाही ।

अशा अनेक वचनांतून संतानी नामस्मरणाची महती पुन्हापुहा आळविली आहे.

तुका म्हणे हरी देई तुझे नाम । अखंडित प्रेमची धावे ।
हेचि माझे तप तेचि माझे दान । तेचि अनुष्ठान नाम तुझे॥
हेचि माझे ज्ञान श्रवण मनन । हेचि निजध्यानासन नाम तुझे॥

तुकारांमानी नामाच्या महतीसाठी प्रत्यक्ष वैकुंठ आणि सायुज्य मुक्ती सुद्धां टाकून दिली आहे. तुकारामांनी एका अभंगात तर गमतीने 'विठ्ठल नामाचा आस्वाद हाच

आपला आहार झाल्याचे म्हटले आहे'. तात्पर्य नामस्मरण हे तुकाराम महाराजांचे सर्वस्व आहे. तुकाराम महाराज असे ही म्हणतात की परमेश्वराच्या नामस्मरणामुळे भवसागराचे पैलतीर सुखरुप गाडता येते. शेवटी 'तुझिया नामाचा विसर न पडावा' असे एकच मागणे तुकारामांनी पांडुरंगाजवळ मागितले आहे. म्हणून आपणही परमेश्वराजवळ हेच मागणे मागावयाचे. संत ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याप्रमाणे परमेश्वराचे नाम सतत मुखी येण्यासाठी सहस्त्र जन्म घ्यावे लागतात. नाम संकीतर्नाची गोडी ही कधीही वरवरची नसते. खऱ्या नामस्मरणाने अष्टसात्विकभाव जागृत होतात. कंप, रोमांच, प्रेमाश्रू, स्फुरण, हास्य, खेद, गायन अशा अनेक भावाने खरा भक्त नामसंकीर्तनात तल्लीन होतो. नाथांनी भागवतात म्हटले आहे.

चितचैतन्या येता भेटी । हर्षे बाल्या दाटे कंठी ॥<br>
पुलकांकित रोमांच उठी । उन्मिलीत दृष्टी पुंजाळे ॥<br>
करिता अच्युतचिंतन । सप्रेम गहिवरे मन ॥

नामस्मरणाचे वैशिष्ठ्य असे आहे की कोणतीही बाह्य उपाधी न घेता नामस्मरण करता येते. श्रवण, कीर्तन, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य या भक्तीत भक्तासमोर कोणीना कोणीतरी लागतोच. नामस्मरण देवाला साक्षी ठेवून करता येते. नामस्मरणाने चित्त शुद्धी होते. नामस्मरणाने निरपेक्ष सुखाचा अक्षय ठेवा भक्ताला लाभतो. आधुनिक संत श्री. के.वि. बेलसरे यांनी आपल्या "नामसमाधी' या सुंदर पुस्तकांत नामस्मरणाचे विवेचन केले. आहे. नामाचा अभ्यास म्हणजे स्थूल देहबुद्धीतून सूक्ष्म आत्मवृद्धीत शिरण्याचाच अभ्यास आहे. नामाच्या अभ्यासाने आपल्या वृत्तीमध्ये परिवर्तन होते व त्यामुळे स्वतःच्या स्वभावात व मनोरचनेत बदल घडवून आणता येतो. नामस्मरणाने आपली वासना शुद्ध करु पूर्ण निःस्वार्थी होता येते व मग आपल्याला मिळालेली आत्मशांती अत्यंत निष्कामपणे दुसऱ्यास देऊन त्यास आपल्याला मिळालेली आत्मशांती अत्यंत निष्कामपणे दुसऱ्यास देऊन त्यास समाधान प्राप्त करुन देता येते. ही सुद्धा एका प्रकारची मोठीच समाजसेवा होय. श्री समर्थ रामदासांनी आपल्या श्रीदासबोधातील दशक चार समास तीन यामधून नामस्मरणाचे माहात्म्य व थोरवी अनेक उदाहरणांनी अत्यंत उत्कट रीतीने भक्तांना पटवून दिली आहे. व दासबोधासारखा महान ग्रंथ निर्माण करुन अखिल मानवजातीवर थोर उपकार केले आहेत. आपल्या जीवनात काही वेळा सुख, दुःख, उद्वेग, चिंता किंवा आंनद असे अनेक प्रकारचे सुखद किंवा दुःखद प्रसंग येतात. तरीसुद्धा (अंखड) नामस्मरण करीत रहावे. तसेच खूप श्रीमंती आली अथवा दारिद्रय आले तरी नामस्मरणाचा विसर पडू देऊ नये. अगदी बालपणापासून तारुण्यापर्यंत व तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यत अगदी अंतःकाळीसुद्धा नामस्मरण करीतच रहावे. उच्च, नीच, लहानथोर, शहाणा किंवा मूर्ख असा भेदभाव नामस्मरण करतांना कधीही आड येत नाही. 'मरामरा' अशा केलेल्या उरफाटा नामस्मरणाने वाल्या कोळ्यासारख्या दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाचा सुद्धा उद्धार झाला व या वाल्मीकी ऋषींकडून रामायणासारखा महान ग्रंथ लिहिला गेला. अशी नामस्मरणाची महती अगाध आहे.

सौ. मालती देवधर<br>
२५४०३४६०

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय**

पुढील परिषद

**आर्थिक गणित**

**दि. २६ ऑगस्ट २००६**

माहितीसाठी संपर्क - प्रा. आर. एस्. पोद्दार, गणितविभाग प्रमुख, बांदोडकर विज्ञान

# मेंदूविषयक संशोधन आणि शिक्षण भाग १

*मेंदू व त्याचे ज्ञानग्रहणातील कार्य यासंबंधी विशेष अभ्यास करणाऱ्या आमच्या ए. के. जोशी विद्यालयातील सौ. विशाखा देशपांडे यांचा हा लेख. - संपादक*

'शिक्षण' म्हणजे कोणत्याही विषयासंबंधी किंवा व्यवसायासंबंधी ज्ञानप्राप्त करणे व त्या शिक्षणाला सुरुवात होते ती अगदी जन्मापासून. मूल जन्माला आले की ते आजूबाजूच्या परिस्थीतीशी जुळवून घ्यायला शिकत असते. भाषा, वस्तू, प्राणी, पक्षी, आकाश, चंद्र, सूर्य, व्यक्ती, नाती या सगळ्यांबद्दल हळूहळू त्याला ज्ञान प्राप्त होत असते. आणि ते समजण्याचे टप्पे, हे प्रत्येक बालकाचे त्याच्या नैसर्गिक क्षमतेप्रमाणे वेगवेगळे असू शकतात. मग एखाद्या मुलाची प्रगती मंद आहे असे दिसले की आपण त्याच्या बुध्दीला व मेंदूच्या क्षमतेला कमी लेखू लागतो. **औपचारिक शिक्षण हे इतके गुंतागुंतीचे आणि अति शिस्तीचे झालेले आहे की त्यामुळे शिकण्याची प्रक्रिया ही मेंदूच्या आकलना पलिकडची आहे, असे मानले जाऊ लागले** परंतु शिकण्याबाबत असलेली नाखुषी मेंदूच्या माथी मारणे योग्य नाही. कारण 'शिकणे' हे मेंदूचे नैसर्गिक कार्य आहे. प्रत्येक मानवी मेंदूमध्ये चार अपावादत्मक गुण असतात.

- आकृतिबंध (patterns) शोधण्याची व त्यानुसार अंदाज बांधण्याची क्षमता.
- विविध स्मृती जतन करण्याची नैसर्गिक क्षमता
- अनुभवांद्वारे शिकण्याची क्षमता
- निर्मिती करण्याची विपुल क्षमता

व्यक्तीचे वय, लिंग, राष्ट्रीयत्व, संस्कृती या सर्वांनी हे चार गुण अबाधित असतात. प्रत्येकाला जर या क्षमता प्राप्त झाल्या आहेत तर मग शिकण्यासाठी एवढा संघर्ष का?

याचं एक प्रमुख कारण म्हणजे मेंदू कार्यरत असताना त्याच्या शिकण्याच्या प्रकियेतील गुंतागुंतही आपण समजून घेत नाही, आणि त्यातील दिमाखही जाणून घेत नाही.

यासाठी प्रथम मेंदूची रचना कशी असते ते जाणून घेणे आवश्यक आहे.

विकसित तंत्रज्ञानामुळे मेंदूविषयक संशोधक अधिक प्रगतीशील झाले आहे. एक्स रे, सी.टी. स्कॅन, एम.आर.आय., पी.ई.टी या तंत्रांमुळे मेंदू प्रत्यक्ष कार्यरत असताना दिसतो व मज्जाशास्त्रातील मेंदू विषयीची नवीन माहिति पुढे येते. मेंदूची रचना तीन भागांत झाली आहे.

१) सरपटणारा मेंदू (Reptilianbrain) - श्वसन, अभिसरण, पुर्नउत्पादन व शारिरीक धोक्यामध्ये हा मेंदू कार्यरत होतो.

२) मॅमेलियन (Mammalian) (सस्तन प्राण्यांचा मेंदू) किंवा Limbic brain (भावनिक मेंदू) हा भावनांचा केंद्र बिंदू आहे. यामध्ये भावनिक प्रसंग एकत्रित करण्यासाठी महत्त्वाचा असलेला amygdala व स्मृती व मूल्ये जतन करण्यासाठी महत्त्वाचा असलेला hippocampus यांचा समावेश असतो. हा. मेंदू, भीती, चिंता, प्रेम, जिव्हाळा यांसारख्या भावना व चव, गंध या सारख्या इंद्रियांद्वारे मिळालेल्या माहितीनुसार परिणामकारक बदल घडवून आणतो. अनुभवांनुसार बदल घडवून आणण्यासाठी हा मेंदू जबाबदार असतो.

३) Neocortex (निओकॉर्टेक्स)- मेंदूचा ८४% भाग हा निओकॉर्टेक्सनी व्यापलेला असतो. उजवा मेंदू व डावा मेंदू अशा दोन भागात Neocortex ची विभागणी होते. ज्ञान ग्रहणाचे व कौशल्य विकसित करण्याचे केंद्र आहे. सर्व विचार, बौद्धिक विकास, भाषा विकास व तार्किक विचारदृष्टींचा विकास Necortex मध्ये होतो. मेंदूमधील पेशींची बांधणी दोन स्तरावर होत असते. जन्मापूर्वी ठोस बांधणी जनुकांच्या रचनांच्या आधारे होत असते. भावनिक मेंदू व निओकॉर्टेक्सची बांधणी जन्मानंतर होते.

मज्जातंतूमध्ये संवेदना पोचवणाऱ्या पेशींना ॲक्झॉन म्हणतात. दोन मज्जातंतू मधील देवाण घेवाण सिनॅप्स मध्ये असणाऱ्या रसायनामधून होते. ती ग्रहण करणाऱ्या मज्जातंतूच्या भागाला डेनड्राइट असे म्हणतात.

पहिल्या दोन वर्षात गरजेपेक्षा जास्त न्यूरॉन्स तयार होतात. कमी वापल्या जाणाऱ्या जोडणीचा हळूहळू नाश होतो. याला प्रनिंग (pruning) असे म्हणातात.

जास्त वापरल्या जाणाऱ्या जोडणीमुळे ॲक्झॉनवर चरबीचा थर साठतो. यामुळे स्पष्ट व कार्यक्षम विद्युत प्रक्षेपण होते. या प्रक्रियेला Myelination असे म्हणतात. जेवढे समृद्ध आणि जास्त अनुभव तेवढा मायेलिनचा थर जास्त असतो.



Play - The Universal language of Children along with Dr. George Forman From USA

बहुसंख्य शिक्षकांची अशी धारणा असते की शिकण्याची प्रक्रिया ही केवळ पाठांतराने व काही ठराविक कौशल्ये प्राप्त केल्यानेच घडत असते. हे म्हणजे आकाशातल्या चंद्राला बघून आम्हाला सूर्यमाला (solar system) कळली ! म्हणण्यासारखे आहे. उदाहरणे शोधून अनुभव घेऊन त्या जतन करण्याची क्षमता मेंदूमध्ये असते हे विचारात घेतले जात नाही. किंवा अनुभवातून अर्थ काढण्याकडे असलेला मेंदूचा कल विचारात घेतला जात नाही.

मेंदू आधारित शिक्षण म्हणजे अर्थपूर्ण अध्ययनासाठी असलेला मेंदूचा कल लक्षात घेऊन शिकवणे.

यासाठी कार्यकारण भाव शोधणे, निरीक्षणाचा खेळ, वजन करण्याचा खेळ इ. दिल्यास विद्यार्थ्यांना अनुभव घेण्यास व अर्थ लावण्यास पूरक ठरेल. अनुभवांचा साठा



World Forum Foundation, President - Rogger Neugebaur (center), Vice President - Bonnie Neugebaur (left), Amy Neugebaur (right) Indian delegate friend - Tejal Mehta (E. L) Vishakha Deshpande (E. R)

आपण दुर्लक्षित करण्याचे आणखी एक उदाहरण देता येईल. समांतर रेषा (parallel lines) या भूमितीमध्ये वयाच्या बाराव्या वर्षी मुलाला शिकवल्या जातात. परंतु बारा वर्षापर्यंत मुलांनी समांतर रेषांची हजारो उदाहरणे पाहिलेली असतात. जशी खिडकीचे बार, कुंपण, चित्रांच्या फ्रेम, मेकॅनिकल खेळणी, रेल्वेचे रुळ इ. मग हे संदर्भ देण्यापेक्षा बहुतांशी शिक्षक फळ्यावर समांतर रेषा काढून त्याची व्याख्या लिहून देतात. मग विद्यार्थी ही काहीतरी नवीन माहिती आहे या अविर्भावात ती वहीत उतरवून घेतात. आणि परीक्षेसाठी त्या व्याख्यांचे पाठांतर करतात. आणि मग समांतर रेषा ही काहीतरी भिन्न आणि अमूर्त पातळीवरील ? माहिती मुले मेंदूमध्ये साठवून ठेवतात. पण समांतररेषा या संबंधातील समृद्ध अशी जोडणी या पूर्वीच मेंदूमध्ये झाली आहे, आणि भूमितीमध्ये अमूर्ततेच्या जवळ जाऊन त्यातून त्याचा अर्थ शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्युक्तच केले जात नाही.

साहित्य, गणित, विज्ञान, इतिहास हे आजकाल विद्यार्थ्यांच्या वास्तव जीवनाशी सांगड न घालता शिकवले जातात. त्याच बरोबर वाचन आणि लेखन हे अर्थ आणि उद्देश यांच्यापासून वेगळे करुन शिक्षणाशी अविभाज्य म्हणून शिकवणे जरुरीचे वाटते. यांच्याच उलट मेंदू आधारित शिक्षण हे वरील विषय काही स्तरांवर एकमेकांशी जोडलेले आहेत. या गोष्टीला गृहीत धरुन त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी अनुभवांच्या संधी एकत्रित करीत असतं. याला 'Thematic teaching' असेही म्हणतात.

तेव्हा शिक्षकांनी कोणत्याही अमूर्त पातळीवरील गोष्टीच्यां पाठांतराकडे किंवा अर्धवट विकसित होणाऱ्या कौशल्यावर भर न देता, अनुभवांचा समृद्ध असा साठा विद्यार्थ्यांना खुला करुन द्यावा. हे जर प्रत्येक शिक्षकाच्या मनाने उचलून धरले तरच शिक्षणामध्ये परिणामकारक असे परिवर्तन होऊ शकेल.

मेंदू आधारित शिक्षणाचा आशय जरी बुद्धीला आव्हान देणारा आणि कष्टप्रद असला तरी तो बऱ्याचदा आनंददायी व प्रेरणादायी ठरतो. यामध्ये एकाच वेळी विद्यार्थी बौद्धिक, भावनिक, शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक गोष्टीत गुंतला जातो. यातूनच क्वचित एकदा, एखाद्याचे असामान्य सामर्थ्य व योगदान कळून येतं. या अनुषंगाने एखादी विशिष्ट शिक्षणपद्धती ही मेंदू आधारित आहे किंवा नाही हे कळून येतं.

आतापर्यंत पाहिलेल्या मेंदू विषयीच्या माहितीचे एकत्रिकरण केल्यास, सारांश म्हणून मेंदू आधारित शिक्षणासंबंधी काही तत्त्वे मांडता येतील ज्याद्वारे शतकांपासून वर्चस्व गाजवणाऱ्या प्रचलित शिक्षण पद्धतींना मागे ठेवता येईल.

१) Brain is a parallel processor - म्हणजे मानवी हा माहितीच्या आधारे, वैचारिक, भावनिक, व कल्पनिकदृष्ट्या एकाच वेळी कार्य करत असतो. त्यानुसार शिकण्याची प्रक्रिया ही एकाच पद्धतीची न राहता, संधी आणि अनुभवांचा संग्रह उपलब्ध करुन देणारी असावी.

२) Learning engages the entire physiology- मेंदूविषयी संशोधनावरुन असे लक्षात येते की मेंदू हा शरीराचा महत्त्वाचा भाग असून शरीर शास्त्रानुसारच त्याचे कार्य चालते. शिकणे हे श्वास घेण्याइतकेच महत्त्वाचे आहे. न्युरॉनची वाढ, पोषण व परस्पर संबंध हे मुलाच्या अनुभवांद्वारे ज्ञानग्रहणाशी निगडित आहेत. आनंद, आव्हाने, तृप्ती, मनःशांती यांच्या सारखाच भीती, दबाव, दहशत या गोष्टींचा मेंदूवर परिणाम होत असतो. मुलाच्या शालेय जीवनातील व सामाजिक जीवनातील सर्व अनुभव यांचा मेंदूमधील विद्युत प्रक्षेपणावर परिणाम होत असतो. ज्याचा शरीरावर सुद्धा परिणाम होतो. मग या सर्व गोष्टींचा शिकण्यावर परिणाम होतो.

याशिवाय शिकवण्याचा कालावधी हा प्रत्येक मुलाच्या मेंदूच्या व शरीराच्या नैसर्गिक विकासावर अवलंबून असतो. एकाच वयाच्या दोन मुलांच्या परिपक्वतेमध्ये पाच वर्षांचाही फरक असू शकतो. त्यामुळे सर्व बालकांकडून वयाच्या क्रमानुसार प्रगतीची अपेक्षा करणे हे अयोग्य आहे.

३. Emotions are critical to patterning - मूल हे नुसतेच शिकत नसते तर त्याचे शिकणे हे भावनांशी निगडित असते. स्मरणशक्तीच्या दृष्टीने भावना महत्त्वाच्या ठरतात. कारण, भावना या मिळालेली माहिती साठवणे व आठवणे सोपे करीत असतात. इथे शिक्षकांनी हे विचारात घेतले पाहिजे की मुलाच्या संवेदना आणि कल हे घटक त्याच्या भविष्यातील शिक्षणाचा रोख निश्चित करत असतात. दळणवळणाचे प्रभावी असे डावपेच लक्षात घेऊनच शाळेतील व वर्गातील भावनिक वातावरण तयार करणे जरुरीचे आहे.

मेंदू विषयीच्या वरील तत्त्वांवर आधारित शिक्षणविषयक काही तत्त्वे सांगता येतील.

१) अध्ययनाला अनुकूल वातावरण निर्माण करणे- आव्हानात्मक ताण, धाक व शिस्त, स्पर्धा व शिक्षा नसलेले प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभागातून अनुभवांचा विपुल असा संग्रह उपलब्ध करुन देणारे विचार करायला लावणारे.

२) अध्ययन शैली कशी असावी - विकासाच्या टप्प्यांच्यानुसार व्यक्तीची भावनिक स्थिती, आवड व कल लक्षात घेऊन, भावनिक व बहुविध बुद्धिमत्तांवर आधारित जाणीवपूर्वक व अजाणतेपणी शिकणे.

प्रत्यक्ष अध्ययन - इंद्रियाद्वारे आकृतिबंधाकरवी स्मरणशक्तीच्या आधारे

सारांश - शिक्षण हे मेंदू सुसंगत असावे. मेंदू विरोधी असू नये. शिक्षणातील संधी या मेंदूच्या बांधणीला पूरक असाव्यात व बालकाच्या क्षमता विकसित व प्रभावी करणाऱ्या असाव्यात.

**सौ. विशाखा देशपांडे**
अभ्यासगट सदस्य, ठाणे जिल्हा शाखा
महाराष्ट्र बाल शिक्षण परिषद
email- vishakha_d22@rediffmail.com
Phone - 2540 2306, 9820926657

प्रा. मोहन पाठक यांसी स.न.
(कार्यकारी संपादक, दिशा)

आज दुपारी 'दिशा' चा डिसें. ०५ चा अंक मिळाला. आभार.

श्रेष्ठ कथाकार श्री. भारत सासणे यांच्या साहित्य सेवेला २५ वर्षे पूर्ण झाली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यांच्या कर्तृत्वाची माहिती आणि सविस्तर सुची प्रसिद्ध केल्याबद्दल डॉ. प्रदिप कर्णिक व आपले मन:पूर्वक अभिनंदन. या लेखाच्या शेवटी 'टीपे'त म्हटले आहे की 'सदर सूचीचे काम सुरु आहे. प्रस्तुत सूची परिपूर्ण नाही याची जाणीव आहे.' तेव्हा या उरलेल्या माहितीची आतुरतेनं वाट पाहत आहे.

**शरद जोशी**
(ग्रंथ प्रसारक)

# परिसर वार्ता



प्राचार्य दि. कृ. नायक

## जलवायु उर्जा - भारतातील इंधन आणीबाणीवरील भविष्यातील उपाजयोजना

"विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने मध्यंतरी "पर्यायी उर्जा स्रोत" या विषयावर एक परिषद आयोजित केली होती. त्यानिमित्ताने जलवायु उर्जा याविषयी माझे कुतुहल जागे झाले. आपल्या देशाच्या उर्जेबाबत असलेल्या आणीबाणीसाठी ही पर्यायी योजना अतिशय उपयुक्त आहे."

फेडरल एजन्सी फॉर सायन्स अँड इनोव्हेशन ऑफ दि रशियन फेडरेशन आणि रशियन चेअरमनशिप तर्फे ६ ते १० फेब्रुवारी २००६ रोजी मॉस्को इथे एक आंतरराष्ट्रीय परिषद 'हायड्रोजन टेक्नॉलॉजिस फॅर एनर्जी प्रॉडक्शन' या विषयावर आयोजित केली होती. या परिषदेसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांना आपला शोधनिबंध सादर करण्यासाठी आमंत्रण होते.

भारतीय अर्थशास्त्रज्ञ हायड्रोजनचे सामाजिक आणि आर्थिक स्वरुप या विषयावर त्यांनी शोधनिबंध सादर केला.

प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांच्या मॉस्को भेटीची जबाबदारी अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळ (AICTE) यांनी घेतली. तसेच भारतात मिनिस्टरी ऑफ नॉन कन्व्हेशनल एनर्जी सोर्सेस तसेच आय. आय. टी आणि BHU यांनी उर्जास्त्रोतात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांनी आपल्या शोधनिबंधात उल्लेख केला.

जागतिक स्तरावर भारत मागे पडतो. सद्य:स्थितीतील उर्जास्त्रोताविषयीची कमतरता, वाहतुकीच्या इंधनाबाबत असलेल्या चढ्या किंमती या अडचणींवर मात करण्यासाठी दूरदृष्टी आणि पर्यायी व्यवस्था असणे आवश्यक आहे तरच सद्य परिस्थितीवर मात करता येईल. जलवायुद्वारे उर्जा मिळवणे, त्याचा साठा करणे. वाहतुकी संदर्भात वापरणे, व्यावसायिकता तसेच सुरक्षिततेच्या संबंधी नियमावली ठरविणे यासाठी "आंतरराष्ट्रीय हायड्रोजन एनर्जी असोशिएशन" युनायटेड नेशन इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑरगनायझेशन इंटरनॅशनल सेंटर फॉर हायड्रोजन एनर्जी टेक्नॉलॉजीस (UNIDO-UNICHET) या संस्था जागतिक स्तरावर प्रयत्न करीत आहेत.

गेल्या दशकात प्रगत राष्ट्रांनी या विषयात लक्षणीय प्रगती केली आहे. काही व्यापारी उपयोजना अस्तित्वात आहेत. पेट्रोलियम इंधन क्षेत्राला नेतृत्व देणाऱ्या "Shell" मते जलवायु हा पेट्रोल इंजिनात वापरण्याची शक्यता भरपूर असल्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग व स्थानिय प्रदूषणांना आळा घालू शकेल. यामध्ये कार्बनची गळती शून्यापर्यंत खाली येऊन पुर्न:वापर करण्यास उपयुक्त अशी उर्जा पाण्यामध्ये निर्माण करता येऊ शकेल.

सध्या हायड्रोजन उपयोगासाठी साठवून ठेवणे हे खूप गुंतागुंतीचे व खर्चिक आहे. तसेच ग्राहकांना इंधन वाहतुकीसाठी देणे हे ही एक प्रकारचे आव्हानच आहे. सुरक्षिततेचे नियम या प्रकारच्या सर्व अडचणी पार करुन जलवायु एक वाहतुकीचे इंधन व्हावे याची गरज हळूहळू वाढत आहे.

या परिषदेबाबत प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांनी असे विचार व्यक्त केले की जागतिक स्तरावर महत्त्वाच्या घडामोडी समजल्या, आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींच्या विचारांची देवघेव झाली. या विषयावर नवीन माहिती ही मिळाली. आणि एकंदर ही परिषद एक वेगळाच अनुभव देऊन गेली.

**पॉलिझीन - प्रकाशन**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या "पॉलिझीन" या वार्षिकाचे प्रकाशन २५ जानेवारी २००६ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे संपन्न झाले.

दीप प्रज्ज्वलनाने कार्यक्रमास आरंभ झाला. यानंतर विद्यार्थ्यांनी ईशस्तवन सादर केले. या कार्यक्रमास प्रसिद्ध लेखक श्री. अनंत सामंत आणि सौ. ए.सी. अत्तार (टी.पी.ओ. डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन) हे दोन सन्माननीय पाहुणे लाभले होते. त्यांची ओळख कु. सोनल पोटे यांनी करून दिली. यानंतर प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांनी तंत्रनिकेतनातील वर्षभरातील घडामोडींचा आढावा घेतला.



डावीकडून "पॉलीझीन" प्रकाशनच्या वेळी लेखक श्री. अनंत सामंत भाषण करताना, प्राचार्य श्री. दि. कृ. नायक आणि प्रमुख पाहुण्या सौ. ए. सी. अत्तार (टी. पी. ओ. डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन)

मराठीतील नामवंत लेखक श्री. अनंत सामंत यांच्या हस्ते 'पॉलिझीन' या वर्षिकाचे प्रकाशन झाले. या शिवाय पॉलिझीन समितीद्वारे आयोजित स्पर्धांमधून बक्षिसे मिळालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्याहस्ते पारितोषिके देण्यात आली.

सौ. ए. सी. अत्तार (टी.पी.ओ.डायरेक्टोरेट ऑफ टेक्निकल एज्युकेशन) यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक पारितोषिके देण्यात आली.

यानंतर श्री. अनंत सामंत यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून त्यांचे विचार सांगितले, त्यात ते म्हणाले "कोणतीही गोष्ट कराल ती मन ओतून करा व नेटाने पूर्ण करा." यानंतर सौ. ए.सी.अत्तार या प्रमुख पाहुण्यांचेही भाषण झाले.

संपादिका सौ. सौंद्रडकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दीप्ती मुळगांवकर यांनी केले.

**बांदोडकर महाविद्यालय**

वनस्पतिशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. श्रीमती मेघा मुळगावकर यांचे अनेक संशोधन निबंध आजवर विविध मान्यताप्राप्त नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. अलिकडेच 'इंडियन जर्नल ऑफ अप्लाइड अँड प्युअर बायोलॉजी' (खंड २१(१), १-८(२००६) या संशोधनास वाहिलेल्या नियतकालिकात त्यांचा "जनरल ॲनॉटॉमी ऑफ सम स्पेसिज् ऑफ जीनस डेनड्रोबियम एस्. डब्ल्यू. फ्रॉम महाराष्ट्र" हा संशोधन निबंध प्रकाशित झाला आहे.

संख्याशास्त्र विभागातील प्रा. सौ. कल्पना फळ यांच्या 'ऑन एस्टीमेटिंग स्केल पॅरमिटर ऑफ अट्रन्केटेड गामा डिस्ट्रिब्युशन' हा संख्याशास्त्रीय गणिताचा निबंध (मुंबई विद्यापीठाचे श्री. उल्हास दीक्षित यांच्या बरोबर लिहिलेला ) शुचाव्ह विद्यापीठ(चीन) प्रकाशित करीत असलेला 'शुचाग्ह जर्नल ऑफ मॅथेमॅटिक्स' मध्ये प्रकाशित झाला आहे. (खंड. ३१, क्र.४ ऑक्टो. २००५)

## गणित मंडळ 'सिद्धांत'तर्फे 'परिसंवाद स्पर्धा'

प्रसिद्ध गणित तज्ज्ञ डॉ. श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीप्रीत्यर्थ बा.ना. बांदोडकर महाविद्यालयातील गणित मंडळ 'सिद्धांत'तर्फे दि. २२ डिसेंबर २००५ रोजी गणित विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'परिसंवाद स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती.

बांदोडकर महाविद्यालयातील गणित विभाग प्रमुख प्रा. पोद्दार सर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

महाविद्यालयातील द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील दहा विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. पोद्दार सर आणि प्रा. सौ. जोगळेकर मॅडम यांनी काम पाहिले.

द्वितीय वर्ष विज्ञान विषयाची विद्यार्थीनी कु. रणजित कौर आणि तृतीय वर्ष गणित विषयाचा विद्यार्थी कु. सलील सावरकर यांना अनुक्रमे पाहिले व दुसरे पारितोषिक देण्यात आले.

या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर

प्रतिवर्षाप्रमाणे यंदा ७ फेब्रुवारी २००६ रोजी १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा समारंभ व 'पारिजातक' या वर्षिक अंकाचे प्रकाशन झाले.

'पारिजातक'चे प्रकाशन आपल्या शाळेची माजी विद्यार्थिनी कु. शुभांगी पवार (G.D.Art) हिच्या हस्ते झाले. आपल्या ओघवत्या भाषणात तिने विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य व स्वैराचार याची योग्य सांगड घातल्यास आपलं व्यक्तिमत्त्व हे १० जणांसारखे न राहता आपण ११ वे वेगळे राहतो असे सांगितले.

प्रकाशन व शुभेच्छा समारंभासाठी प्रमुख पाहूणे वसुंधरा हेल्थ केअर व पितांबरी उद्योग समूहाचे संचालक श्री. रविंद्र प्रभुदेसाई हे होते. आपला १० वी ते पितांबरीचा प्रवास विद्यार्थ्यांना कथन करीत असतांना 'निरीक्षणाचे महत्त्व' आणि 'नियोजन' ह्या दोन गोष्टींना आयुष्यात महत्त्व द्या तसेच जीवनांत आपल्याला कांही वेगळं करायचं असेल तर आपल्यातली भिन्नता ओळखून चारचौघांप्रमाणे कळपात न राहता 'वाघा' प्रमाणे वेगळे रहा तरच स्वतंत्र भरारी मारता येते असे सांगितले.

पारिजातक अंकाच्या कार्यकारी संपादिका आशा जोशी यांनी 'संधीचा फायदा' घ्या असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

मा. मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांनी 'यशाचं रहस्य' कसे ओळखायचे हे सांगण्यासाठी विद्यार्थ्यांना तत्त्ववेत्ता सॉक्रिटीस याची सुंदर कथा सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. ज्योती सोमण यांनी केले. प्रास्ताविक उपमुख्याध्यापिका सौ. अनुराधा खोपकर यांनी केले तर पर्यवेक्षिका सौ. उषा कळमकर यांनी आभार मानले.

८ फेब्रु. रोजी १० 'अ' आणि 'ब' च्या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाचे मार्गदर्शन श्री. धोंड यांनी केले.

१३ फेब्रु.०६ रोजी आपल्या शाळेला लंडन मधील ३६ शिक्षकांनी भेट दिली. विज्ञान, गणित आणि नागरिकशास्त्र या विषयांची अधिक माहिती, अध्यापन पद्धती, शाळेचे नियोजन, व्यवस्थापन, कशा प्रकारे केले जाते याची प्रत्यक्ष माहिती त्यांनी घेतली. संस्कृत, विज्ञान इंग्रजी या विषयांचे पाठ पाहिले. हस्तकला, शैक्षणिक साधने, प्रयोगशाळा या दालनांना विशेष भेटी दिल्या.

२८ फेब्रु. रोजी विज्ञानदिन साजरा झाला. मराठी विज्ञान परिषदेचे उपाध्यक्ष श्री. दा. कृ. सोमण, सभासद

श्री. खरे, सौ. सहस्त्रबुध्दे पाहूणे म्हणून आले होते. मुख्याध्यापिका सौ. केळकर यांनी स्वागत केले. उपमुख्याध्यापिका सौ. खोपकर यांनी प्रास्ताविक केले. श्री. दा.कृ सोमण यांनी पारदर्शिकांच्या सहाय्याने 'आकाशातील आश्चर्ये' या विषयावर व्याख्यान दिले. आणि विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. सौ. कुमावत यांनी पाहुण्यांचा परिचय तर सौ. अडसुळे यांनी पाहुण्याचे आभार मानले. १८ व १९ फेब्रुवारी रोजी 'घंटाळी प्रबोधिनी' तर्फे सामूहिक नृत्य स्पर्धा व वादन स्पर्धा घेण्यात आली. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी 'रिंद पोशिया' चित्रपट 'मिशन काश्मिर' व 'हे जीवन सुंदर आहे', चित्रपट 'चौकट राजा' ही दोन नृत्ये सादर केली तसेच श्रध्दा यादव (८अ) हिने पेटीवादन स्पर्धेत भाग घेतला, तिला द्वितीय क्रमांकाचे मिळाले.

२२ फेब्रुवारी रोजी स्काऊट-गाईडचा चिंतन दिन मेळावा 'येऊर' येथे निसर्गरम्य परिसरात सादर झाला. इ.७ वीच्या स्काऊट गाईडचे विद्यार्थी विद्यार्थिनी त्यात सहभागी होते.

विद्यार्थ्यांनी तेथे बिनभांड्याचा स्वयंपाक, साहसी खेळ, स्वप्नपूर्ती खेळ, प्रदर्शन या सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेतला त्यांना 'प्रदर्शन'साठी प्रथम क्रमांकाचे व 'खरी कमाई'साठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

कु. अशालता लोखंडे, श्री. सोनावणे, श्री. पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### डॉ. नागेश शं. टेकाळे

डॉ. नागेश शं. टेकाळे, प्रपाठक, वनस्पतिशास्त्र विभाग, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे हे ६ ते ८ फेब्रुवारी २००६ या कालावधीत ढाका, बांगलादेश येथे झालेल्या ८ व्या राष्ट्रकुल परिषदेस उपस्थित राहून मायदेशी परत आले. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय होता



डॉ. नागेश टेकाळे

''अतिसार व कुपोषणाने होणारे बालमृत्यू''. डॉ. टेकाळे यांनी या परिषदेत ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बालकांचे कुपोषण व अतिसाराने होणारे अकाली मृत्यू योग्य पातळ आहार दिला असता कसे नियंत्रित करता येऊ शकतील यावरील आपल्या संशोधनाचे निष्कर्ष मांडले. या परिषदेस ३८ राष्ट्रांचे १८० प्रतिनिधी हजर होते. डॉ. टेकाळे ठाणे जिल्ह्याच्या जव्हार व मोखाडा या दूर्गम आदिवासी भागात गेले एक दशक कुपोषण नियंत्रणावर कार्यरत आहेत.

### एन्.सी.सी.चे राष्ट्रीय एकात्मता शिबीर

एन्.सी.सी.चे राष्ट्रीय एकात्मता शिबीर २८ ऑक्टो. २००५ ते ८ नोव्हें २००५ या कालखंडात विद्या प्रसारक मंडळाच्या विस्तीर्ण अशा ठाणे महाविद्यालय परिसरात संपन्न झाले. शिबीराचे कमांडंट १ महाराष्ट्र बटालियन चे कर्नल आर. चटर्जी हे होते तर लेफ्टनंट डॉ. मोझेस कोलेट हे शिबीर संयोजक होते. एन.सी.सी. तील सीनिअर अंडर ऑफिसर असणारे सचिन माळी व माला ठाकरे यांनी वरिष्ठ छात्र म्हणून काम पाहिले.

शिबीराचे उद्घाटन दि. २९ ऑक्टोबर २००५ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले. ब्रिगेडियर आर्.सी.शर्दे (एन्. सी. सी. संचालनालयाचे सह संचालक) व विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. एन.सी.सी. स्वागत समितीच्या छात्रांनी पारंपारिक पध्दतीने पाहुण्यांचे

स्वागत केले. दीप प्रज्ज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. छात्रा मधुश्री कामत व मनस्वी गोंधली यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

छात्रांना केलेल्या मार्गदर्शनपर भाषणात ब्रिगेडियर शर्द यांनी विद्या प्रसारक मंडळाचे विशेष आभार मानले. श्री. श्री. वि. करंदीकर यांनी विद्या प्रसारक मंडळाविषयी माहिती सांगून भारतभरातून आलेल्या एन्.सी.सी. छात्रांचे स्वागत केले. आपले येथील वास्तव्य आनंददायी आठवणींचे ठरावे अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली. या औपचारिक कार्यक्रमानंतर छात्रांनी बसविलेले सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.



**प्रतिक्रिया वहीत आपली प्रतिक्रिया लिहिताना ब्रिगेडिअर आर. सी. शर्द**

या एकात्मता शिबीरात एन्.सी.सी.तील ६५० छात्र भारतभरातून सहभागी झाले होते. शिबिराच्या कालावधीत प्रांतीय सद्‌भावना वाढीस लागण्याच्या दृष्टीने वेशभूषा स्पर्धा, गीत, नृत्यादी कलाविष्कारांचा स्पर्धा, निबंध व चित्रविष्कार स्पर्धा इ. स्पर्धांचे आयोजन केले गेले. प्रत्येक राज्याच्या संचालनालयाने स्वतंत्र ३० मिनीटांचे सादरीकरण करुन सांस्कृतिक सद्‌भावास उत्तेजन दिले व त्यातून राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेविषयी जागृती निर्माण केली. दिवाळीचे दिवसही उत्साहात साजरे केले गेले. मुंबई दर्शन सहलीचाही छात्रांनी लाभ घेतला.

पुढील पाच विशेष व्याख्यानांचे आयोजनही करण्यात आले.

१. तणावांचे व्यवस्थापन - प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग

२. पर्यवेक्षण सप्ताह संदर्भात पर्यवेक्षणाचे महत्त्व व गरज प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर

३. एड्स् संबंधीचे गैरसमज - डॉ. मोझेस कोलेट

४. आरोग्य व स्वास्थ - डॉ. विंदा मांजरमकर

५. परिसर विज्ञान - उत्तरप्रदेश येथून आलेले डॉ. ए. के. सिंग

भारतीय हवाई दल स्थानक, कोलशेत प्राच्य विद्या अभ्यास संस्था येथे शैक्षणिक सहलींचे आयोजन केले गेले.

**समारोप व पारितोषिक वितरण**



**समारोप समारंभात महिला छात्रेस पारितोषिक देताना श्री. श्री. वि. करंदीकर, मध्ये - डॉ. मोझेस कोलेट मागे डावीकडून डॉ.सौ. विंदा मांजरमकर.**

शिबिराचा समारोपाचा कार्यक्रम ७ नोव्हेंबर २००५ रोजी झाला. श्री. श्री. वि. करंदीकर, Grp.कॅप्टन व्ही. के. सूद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर श्री. करंदीकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली. प्रा. डॉ. मोझेस कोलेट यांनी एकात्मता व शिस्त पालन केल्याबद्दल सर्व छात्रांचे आभार मानले.